शनिवार, ७ मे २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २८९
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## शुभ वर्तमान! यंदा वरुणराजाचे लवकर आगमन



**मुंबई :** सध्या देशात उन्हाचा चटका वाढला असून दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. अशातच देशातील नागरिकांसाठी एक खुशखबर आहे. या वर्षी देशात १० दिवस आधीच मान्सून दाखल होणार आहे. मान्सून २० किंवा २१ मे रोजी केरळच्या किनारपट्टीवर धडकणार आहे. त्यानंतर तो पुढील काही दिवसात देशाच्या उर्वरित भागांत बरसणार असल्याचा अंदाज युरोपियन सेंटर फॉर मीडियम-रेंज वेदर फोरकास्ट या संस्थेने वर्तविला आहे. मान्सून दरवर्षीपेक्षा लवकर दाखल होणार असल्याने ही आनंदाची बातमी आहे, कारण उन्हाचा चटका वाढल्याने अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई भासत आहे तसेच पिकांनाही पाण्याची गरज आहे. त्यामुळे अशा काळातच पाऊस पडणार असल्याने शेतकऱ्यांनाही दिलासा मिळू शकतो.

अंतरंग

पनवेल भोकरपाड्यात विकासकामांचा शुभारंभ/३

अंबा नदीचे पाणी झाले चिखलयुक्त/५

महिलांसाठी मोफत क्रिकेट प्रशिक्षण शिबिर/८

# खारघरमधील पाणीप्रश्नी भाजपचे आंदोलन

- पाणीपुरवठा ३१ मेपर्यंत सुरळीत करावा
- अन्यथा सिडको भवनमध्ये घुसणार
- आमदार प्रशांत ठाकूर यांचा इशारा



(छाया : लक्ष्मण ठाकूर)



**पनवेल : प्रतिनिधी**

खारघर येथील अनियमित व अपुऱ्या पाणीपुरवठ्यात ३१ मेपर्यंत सुधारणा न झाल्यास कोणतीही नोटीस न देता सिडको भवनमध्ये घुसू आणि पाणी मिळत नाही तोपर्यंत तेथेच मुक्काम करू, असा इशारा भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. ६) खारघर येथे दिला. ते भाजपच्या आंदोलनात बोलत होते.

सिडकोने वसविलेल्या खारघरमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून पाणीटंचाईची समस्या नागरिकांना भेडसावत आहे. या संदर्भात येथील रहिवाशांकडून अनेक तक्रारी सिडको कार्यालयात करण्यात आल्या आहेत. असे असताना प्यायला पाणी नाही, पण सिडको नवीन प्रकल्पांना भोगवटा प्रमाणपत्र देत सुटली आहे. त्यामुळे रहिवाशांना फक्त ५० टक्के पाणीपुरवठा होतो. या संदर्भात भाजप खारघर-तळोजा मंडलच्या वतीने वेळोवेळी सिडकोकडे पाठपुरावा करण्यात आला, मात्र याकडे सिडको दुर्लक्ष करीत असल्याने भारतीय जनता पक्षातर्फे खारघर सेक्टर १४ येथे सुरू असलेल्या गृहसंकुलाचे बांधकाम व खारघर रेल्वेस्थानकाच्या पूर्वेला सुरू असलेल्या गृहसंकुलाचे बांधकाम बंद पाडण्यासह खारघर येथील अनियमित पाणीपुरवठ्याबाबत शुक्रवारी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले

या आंदोलनात भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, प्रभाग समिती 'अ'च्या सभापती संजना कदम, नगरसेवक हरेश केणी, अभिमन्यू पाटील, प्रकाश बिनेदार, बबन मुकादम, प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे, रामजी बेरा, निलेश बाविस्कर, पापा पटेल, माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर, नगरसेविका अनिता पाटील, नेत्रा पाटील, आरती नवघरे, कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे, किर्ती नवघरे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, निर्दोष केणी, संजय घरत, महिला मोर्चाच्या बिना गोगरी, अल्पसंख्याक सेल प्रदेश सचिव मन्सूर पटेल, उत्तर रायगड सरचिटणीस इर्शाद पटेल, मुनाफ पटेल, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष विनोद घरत, कामोठे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, भाजप नेते वासुदेव पाटील, अमर उपाध्याय, अनिल साबणे, समीर कदम, अजय माळी, राजेंद्र मांजरेकर, विपूल चौतालिया, संदीप रेड्डी, नवनीत मारू, राजेंद्र अग्रवाल, रूपेश चव्हाण, शैलेंद्र त्रिपाठी, सुमित सहाय, विनोद ठाकूर, साजिद पटेल, नवनीत मारू, प्रभाकर जोशी, जयदास तेलवणे, संदीप एकबोटे, विनोद ठाकूर, राजेंद्र अग्रवाल, गजेंद्रसिंग शेरावत, कुणाल संघांनी, राजेंद्र प्रभू, सूर्या दुडम, विजय उजळंबे, संजय मुळीक, आदर्श सोहोनी, आदेश भोईर, सचिन केदार, विनोद दाभोळकर, दीपक खुडे, सचिन वास्कर, लखवीरसिंग सैनी, गीता चौधरी, मोना अडवाणी, आशा बोरसे, साधना पवार, प्रतीक्षा कदम, निर्मला यादव, सुशीला शर्मा, अनिता जाधव, माधवी कोडरू, दुर्गा बन्सल, अंकिता वारंग, कांचन बिर्ला, शोभा मिश्रा, चांदणी अवघडे, स्मिता आचार्य, वैशाली प्रजापती, श्यामला सुरेश, सुनीता मुळीक, आशा शेडगे, रोहिणी अमराले, हर्ष सोनावणे, नीता चौधरी, नंदा पानसरे, सुनंदा देसाई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. **(पान २ वर..)**

## नवी मुंबईतील पावणे एमआयडीसीत अग्नितांडव

### आठ कंपन्यांना आग | चार कामगार जखमी



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील पावणे एमआयडीसीमध्ये शुक्रवारी (दि. ६) आठ कंपन्यांना भीषण आग लागून चार कामगार जखमी झाले. त्यांना वाशीतील प्रथम संदर्भ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

सुरुवातीला एका कंपनीला आग लागून ती पसरली. या आगीत इतर सात कंपन्यांचेही नुकसान झाले आहे. आगीचे वृत्त समजताच ठाणे, पावणे, महापे, कोपरखैरणे वाशी, ऐरोली या ठिकाणांहून अग्निशमन दलाच्या गाड्या येऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करीत होत्या. आठपैकी एका कंपनीत असलेल्या रबरामुळे आग विझली तरी पुन्हा भडकत होती.



**उलवे नोड : भाजप महिला मोर्चाच्या माध्यमातून सेक्टर १७ येथे महिलांसाठी योगा अभ्यास केंद्र साकारण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. (वृत्त पान ३ वर..)**

### निवडक

#### राणांविरोधात राजद्रोह दाखल करणे चुकीचे

**मुंबई :** खासदार नवनीत राणा व त्यांचे पती आमदार रवी राणा यांच्याविरोधात राजद्रोहाचा गुन्हा दाखल करणे चुकीचे असल्याचे म्हणत मुंबई सत्र न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले आहे. पोलीस नोटीसनंतर राणा दाम्पत्य घराबाहेर पडले नाही. अटक होण्यापूर्वीच त्यांनी 'मातोश्री'बाहेर हनुमान चालिसा वाचण्याचे आंदोलन मागे घेतले होते. तरीही त्यांच्यावर राजद्रोह लावणे चुकीचे होते, असे कोर्टाने म्हटले आहे.

#### नगरमध्ये अपघातात सहा जणांचा मृत्यू

**कोपरगाव :** मुंबई-नागपूर महामार्गावर कोपरगाव तालुक्यात एका कंटेनरने समोरून येणाऱ्या मोटरसायकलला कट मारून प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षेस धडक दिली. या अपघातात रिक्षेतील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला, तर रिक्षेतील प्रवाशांसह मोटरसायकलवरील तिघे असे सात जण गंभीर जखमी झाले आहेत.

#### मलिकांच्या कोठडीत २० मेपर्यंत वाढ

**मुंबई :** मनी लॉण्डरिंग प्रकरणात अटकेत असलेले महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या कोठडीत विशेष ईडी न्यायालयाने २० मेपर्यंत वाढ केली आहे. त्यामुळे मंत्री मलिक यांचा कोठडीतील मुक्काम वाढला आहे. मलिक यांना ईडीने अटक केलेली असून सध्या ते आर्थर रोड तुरुंगात आहेत.

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांची आज पुण्यतिथी


### सीकेटी महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांची शनिवारी (दि. ७) ३४वी पुण्यतिथी आहे. त्यांना अभिवादन करण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने सकाळी ११.३० वाजता खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

जनार्दन भगतसाहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट आहे. त्यांनी अहोरात्र जनतेची सेवा केली. फक्त राजकारण नाही, तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. आयुष्यापेक्षा ध्येय मोठे असले पाहिजे, अशी शिकवण त्यांनी समाजामध्ये रूजवली. त्यांच्या नावाने व आशीर्वादाने सुरू झालेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने दरवर्षी पुण्यतिथी कार्यक्रम आयोजित केला जातो. त्या अनुषंगाने शनिवारी होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असणार आहेत. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, कार्यकारी मंडळ सदस्य नगरसेवक अनिल भगत, प्रकाश भगत, हरिश्चंद्र पाटील, महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, कार्यकारी मंडळ सदस्य संजय भगत, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, वसंत पाटील, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.




स्नेह निमंत्रण



स्व. जनार्दन भगतसाहेब यांची ३४वी पुण्यतिथी

शनिवार, दिनांक ७ मे २०२२ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता

स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३४ व्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार दिनांक ७ मे २०२२ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (ऑटोनॉमस) प्लॉट नं.१, सेक्टर ११ खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे आपल्या संस्थेमार्फत पुण्यतिथी कार्यक्रम आयोजित केला असून कार्यक्रमासाठी खालील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

समारंभ अध्यक्ष

मा. श्री. रामशेठ ठाकूरसाहेब
माजी खासदार, तथा चेअरमन ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

प्रमुख पाहुणे

मा. श्री. अरुणशेठ भगत
अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल तथा अध्यक्ष, पनवेल तालुका भारतीय जनता पार्टी

मा. आमदार श्री. प्रशांत ठाकूर
पनवेल विधानसभा तथा अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पार्टी तथा संचालक, ज. भ.शि.प्र. संस्था, पनवेल.

मा. श्री. वाय. टी. देशमुख
उप कार्याध्यक्ष, ज. भ.शि.प्र. संस्था, पनवेल

मा. श्री. अनिल पांडुरंग भगत
कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र. संस्था, पनवेल

मा. श्री. प्रकाश जनार्दन भगत
कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

मा. श्री. हरिश्चंद्र गणपत पाटील
कार्यकारी मंडळ सदस्य, ज. भ.शि.प्र. संस्था, पनवेल

मा. श्री. परेश ठाकूर
कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल. गटनेते, पनवेल महानगरपालिका पनवेल

मा. श्री. संजय जनार्दन भगत
कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल संचालक, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल

मा. सौ. वर्षा प्रशांत ठाकूर
कार्यकारी मंडळ सदस्या, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

मा. श्री. वसंत हरी पाटील
कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

मा. श्री. संजय शंकर पाटील
कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

मा. सौ. अर्चना परेश ठाकूर
सभासद, ज.भ.शि.प्र. संस्था, पनवेल

आपले स्नेहांकित

प्राचार्य डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे
सचिव, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद,
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

स्थळ : चांगू काना ठाकूर आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, (ऑटोनॉमस) प्लॉट नं. १, सेक्टर ११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

## ओबीसी आरक्षण पुन्हा लागू करण्यासाठी

# न्यायालयाच्या सूचनेनुसार काय केले सांगा?

### ■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा आघाडी सरकारला सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने तिहेरी चाचणी पूर्ण केल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींचे राजकीय आरक्षण पुन्हा लागू होणार नाही, असा स्पष्ट निकाल दिल्यानंतर सत्ताधारी महाविकास आघाडी सरकारने त्या दृष्टीने कोणतेही गंभीर प्रयत्न केले नाहीत, असा सवाल भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांता पाटील यांनी शुक्रवारी पुण्यात पत्रकारांशी बोलताना केला. ओबीसी राजकीय आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार काय काम केले, याची माहिती देणारी श्वेत पत्रिका प्रसिद्ध करावी, असे आव्हान त्यांनी आघाडी सरकारला दिले.

त्यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा लागू करण्यासाठी समर्पित आयोग नेमणे, त्याच्या माध्यमातून एंपिरिकल डेटा गोळा करणे आणि एकूण आरक्षण पन्नास टक्क्यांच्या वर जाऊ न देणे, अशी तिहेरी चाचणी पूर्ण करण्यास सांगितले आहे. शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाविकास आघाडी सरकारने काही दिवसांपूर्वी समर्पित आयोग नेमला आहे. अजून एंपिरिकल डेटा गोळा केलेला नाही. आघाडी सरकारने न्यायालयाच्या सूचनेनुसार काही काम केले नाही तर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असाच येणार. ते म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय होणार हे स्पष्ट आहे. तरीही आघाडी सरकारचे नेते ओबीसी आरक्षणासहच निवडणूक होईल, असे कशाच्या आधारावर सांगतात? ओबीसी आरक्षण रद्द झाल्यावर राज्यात १०६ नगरपंचायतींच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाशिवाय झाल्या, पाच जिल्हा परिषदांमध्ये ओबीसींच्या जुन्या राखीव जागा रद्द होऊन त्या खुल्या समजून पोटनिवडणूक झाली. सरकारला हे रोखता आले नाही. आघाडीचे नेते ओबीसी समाजाला लॉलिपॉप दाखवत आहेत. ते ओबीसींना फसवत आहेत. आघाडी सरकारने ओबीसी समाजाच्या पाठीत खंजीर खुपसला असल्याचेही ते म्हणाले.

> **...तरीही भाजप २७ टक्के जागा ओबीसींना देणार**
>
> *आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत ओबीसींसाठी आरक्षण नसले तरीही भाजप २७ टक्के जागांवर ओबीसींनाच उमेदवारी देईल. इतर राजकीय पक्षांनीही अशी बांधिलकी दाखवावी. उत्तर प्रदेशातील एका भाजपा खासदाराने मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविषयी केलेले वक्तव्य हे वैयक्तिक वक्तव्य आहे ही पक्षाची भूमिका नाही. भाजपा व मनसेची निवडणुकीत युती करण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही. मनसेकडून तसा काही प्रस्तावही आलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतीशताब्दीनिमित्त त्यांना चंद्रकांतदादा पाटील यांनी भाजपातर्फे आदरांजली अर्पण केली.*

## प्रशासकीय सेवेत आस्थापना विषयक अद्यावत माहिती आवश्यक

### ■ कोकण महसूल उपायुक्त मकरंद देशमुख

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शासकीय सेवेत आस्थापना विषयक बाबींची अद्यावत माहिती असणे आवश्यक असून त्या माध्यमातून प्रशासन गतिमान होण्यास मदत होते. यासाठी आस्थापना विषयक कार्यशाळा महत्त्वाची असल्याचे मत उपायुक्त महसूल मकरंद देशमुख यांनी शुक्रवारी (दि. ६) येथे व्यक्त केले.

कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्यावतीने विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आस्थापनाविषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी देशमुख बोलत होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक माहिती प्रशासन गोविंद अहंकारी, सेवानिवृत्त अवर सचिव रा.ना.मुसळे प्रमुख पाहुणे म्हणन उपस्थित होते. कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, रत्नागिरीचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर, रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, ठाणे जिल्हा माहिती अधिकारी अजय जाधव, पालघर जिल्हा माहिती अधिकारी राहूल भालेराव आणि माहिती व जनसंपर्क कोकण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. आस्थापनाविषयक मार्गदर्शिका मे २०२२ या पुस्तिकेचे प्रकाशन या वेळी करण्यात आले. या वेळी देशमुख म्हणाले की, आस्थापना विषय काम करताना अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शासननिर्णय, शासन परिपत्रक याबाबतीत अद्यावत असणे आवश्यक आहे. शासकीय प्रकरणे हाताळताना ही प्रकरणे न्यायालयीन दृष्टीकोनातून हाताळणे महत्वाची आहेत. त्यासाठी संबंधितांनी त्या प्रकरणांचा सखोल अभ्यास करावा. मुसळे यांनी आस्थापने विषयीच्या प्रमुख मुद्यांवर तपशिलवार माहिती दिली. यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामात आस्थापना विषयी विविध प्रश्नांबाबत चर्चा केली. या प्रश्नांना मुसळे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

## दुखवटा

### अशोक पाटील

**उरण : वार्ताहर**



केगावचे माजी उपसरपंच अशोक पाटील (६७) यांचे सोमवारी (दि. २) अल्पशा आजाराने निधन झाले. ते केगाव ग्रामपंचायतींमध्ये १९७७ ते २०१५ दरम्यान सहावेळा सदस्य म्हणून निवडून आले होते. त्यांनी उपसरपंचपदाची धुराही सांभाळली आहे. ३६ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत त्यांनी अनेक सामाजिक कामे करुन गावाचा विकास केला. त्यांचे सोमवारी मुंबईतील रुग्णालयात अकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर केगाव-दांडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

या वेळी आमदार महेश बालदी, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य विविध राजकीय पक्षांचे नेते उपस्थित होते. कै. पाटील यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

### भिमाबाई आरीवले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



तालुक्यातील महालुंगी येथील भिमाबाई आरीवले यांचे अल्पशा आजाराने रविवारी (दि. १) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, जावई असा परिवार आहे.

## नैना प्रकल्पाच्या प्रारुप नगररचना परियोजनेंतर्गत हरकती नोंदवाव्यात

### सिडकोचे जमीन मालकांना आवाहन

**पनवेल : सिडको वृत्तसंख्या**

नैना प्रकल्पाकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नैना प्रकल्पातील २३ गावांच्या मंजूर करण्यात आलेल्या अंतरिम विकास आराखड्याची अंमलबजावणी सिडकोतर्फे करण्यात येत आहे. त्यानुसार प्रारुप नगर रचना परियोजना क्र. ४, ५, ६ आणि ७ तयार करण्याचा इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रासोबतच स्थानिक वर्तमानपत्रांतही जाहीर करण्यात आला होता. या प्रारुप योजनांविषयी सूचना व हरकती असल्यास जमीन मालकांनी सिडको नैना कार्यालयात सादर करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

या प्रस्तावाचा भाग म्हणून प्रारुप नगर रचना परियोजना क्र. १, २ आणि ३ला शासनाने मंजुरी दिली आहे. प्रारुप नगर रचना परियोजना क्र. ४, ५, ६ आणि ७ तयार करण्याचा इरादा अनुक्रमे दि. २१ जून २०१९, २६ जून २०१९, ८ ऑगस्ट २०१९ व १८ सप्टेंबर २०१९ रोजी जाहीर करण्यात आला होता. या योजना प्रसिद्ध करण्यासंबंधीची सूचना २५ एप्रिल २०२२च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच स्थानिक वृत्तपत्रांमध्येही याबाबतची सूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. या परियोजनांचे सविस्तर नकाशे, अहवाल आणि नियमावली फॉर्म क्र. १ व २ जमीन मालकांना पाहण्याकरिता नैना कार्यालय, सातवा मजला, टॉवर क्र. १०, सीबीडी बेलापूर रेल्वे स्थानक संकुल तसेच सिडकोच्या www.cidco.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सिडकोच्या संकेतस्थळावर परियोजनांचा तपशील उपलब्ध आहे. काही तफावत आढळल्यास तसेच उपरोक्त प्रारुप योजनांविषयी काही सूचना व हरकती असल्यास प्रारुप योजना प्रसिद्ध करण्यासंबंधीची सूचना वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत सिडकोच्या नैना कार्यालयात ७/१२ आणि गटबुकासह सादर कराव्यात, असे आवाहन आहे.

पान १ वरून

## खारघरमधील पाणीप्रश्नी भाजपचे आंदोलन

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आंदोलन केल्याशिवाय सिडकोला काही ऐकूच येत नाही. त्याशिवाय सिडको कोणतेही काम करीत नसल्याचा आपल्याला अनुभव आहे. त्यामुळे आज सगळ्यांना कडक उन्हात येथे बसून आंदोलन करावे लागत आहे. या भागात जवळजवळ एक लाख नवीन घरे बांधली जात आहेत. या घरांमध्ये सुमारे पाच लाख लोक राहायला येतील. सद्यस्थितीतच येथील लोकांना पुरेसे पाणी मिळत नसताना नवीन लोक राहायला आल्यावर येथील पाण्याच्या परिस्थितीची कल्पनाच करता येणार नाही म्हणून आज हे आंदोलन करावे लागत आहे.

खारघर, कामोठे, तळोजा या नोडमधील पाण्याच्या प्रश्नासाठी अनेक वर्षे जॉईंट एमडीची नेमणूक करण्याची मागणी केल्यावर या नोडसाठी त्यांची नेमणूक झाली, पण पाण्याची समस्या सुटली नाही. बाळगंगा व कोंढाणे धरणाच्या कामात मोठा घोटाळा झाल्याने त्यांचे काम पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे नवीन येणाऱ्या नागरिकांना पाणी कसे देणार असा प्रश्न विचारला की, पातळगंगा धरण आणि पनवेल महापालिकेच्या धरणाची पातळी वाढवून पाणी घेता येईल असे सिडको सांगते, पण हे फक्त कागदावरच असते. मी सिडकोचा अध्यक्ष असताना एमडींना तांत्रिक सल्लागार नेमणे आवश्यक असल्याचे सांगितल्यावर टाटा कन्सल्टन्सीची नेमणूक करण्यात आली. त्यांच्यासोबत स्थानिक नगरसेवक व सोसायटी अध्यक्ष यांचीही बैठक घेण्यास सांगूनही घेतली जात नाही. सिडको या भागात ठेकेदारामार्फत पाण्याचे वाटप करते. त्यामुळे अनेक भागांत पुरेसे पाणी मिळत नाही, तर काही भागांत २४ तास पाणी दिले जाते. नवी मुंबई महापालिकेप्रमाणे येथेही ऑटोमॅटिक सिस्टिमचा वापर करण्याची आमची मागणी आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

पनवेल महापालिका २०१६मध्ये स्थापन झाली. आम्ही सिडकोकडून रस्ते, कचरा व पाणी यांसारख्या एक-एक सेवा ताब्यात घेत आहोत. रस्त्यांची कामे करून देण्यास सिडकोने वेळ लावल्याने या सेवा ताब्यात घेण्यास वेळ लागत आहे. सिडकोने विकास खर्चाच्या नावाखाली पैसा घेतला असल्याने त्यांनी ही कामे करून देणे आवश्यक आहे. कोविड नसता, तर केंद्राची अमृत योजना पूर्ण झाली असती व पाण्याचा प्रश्न सुटला असता. मग आम्हाला सिडकोवर अवलंबून राहावे लागले नसते, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले.

सिडको कार्यकारी अभियंता एन. जे. चौथानी यांनी आमची भेट घेऊन २० तारखेपर्यंत सगळे सुरळीत होईल, असे सांगितले, पण लोकांचा त्यांच्यावर आता विश्वास नाही. त्यामुळे ज्या सोसायटीत पाणी येणार नाही त्यांना सिडकोने टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा करावा; अन्यथा सिडकोच्या अधिकाऱ्यांचे पत्ते शोधून पाण्याची भांडी घेऊन त्यांच्या घरी जाऊ, त्यांच्या घरून पाणी आणू, त्यांना झोपू देणार नाही, असे सांगून त्यांना आम्ही ३१ मेपर्यंत मुदत देतो. त्यांनी एमडींना सांगून कारभारात सुधारणा करावी; अन्यथा आम्ही सिडको भवनमध्ये घुसल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी दिला.


**उरण नगरपरिषद, उरण**
**जिल्हा : रायगड**

**प्रथम संक्षिप्त ई-निविदा सूचना क्रमांक**
**उनप/बांवि/३/२०२२-२०२३**

उरण नगरपरिषद क्षेत्रातील खालील कामाची संपूर्ण तपशिलासह सविस्तर ई-निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषदेचे हद्दीतील मोरा, बोरी, कुंभारवाडा इ. ठिकाणी मुख्य रस्त्यांना डांबर पॅचवर्क करणे. | रु. ४१,२५,७५१/- |

तरी अर्हता प्राप्त इच्छुक निविदाकारांनी दिनांक ७-५-२०२२ ते १७-५-२०२२ या कालावधीत वरील संकेतस्थळावर रितसर निविदा अपलोड करावी.

जा.क्र. उनप/बांवि./४११/२०२२-२०२३
दिनांक :- ०६/०५/२०२२

सही/-
मुख्याधिकारी
उरण नगरपरिषद



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६**

दूरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/आस्था/३६२२/प्र.क्र.२/३१८/२०२२ दिनांक :- ०६/०५/२०२२

**थेट मुलाखत** (Walk in Interview)
(DAY-NULM **अंतर्गत 'समुदाय संघटक' रिक्त पद भरणेकरीता जाहिरात)**

पनवेल महानगरपालिकेमध्ये दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) केंद्रशासन पुरस्कृत अभियानांतर्गत **'समुदाय संघटक'** एका पदाकरीता तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरीता, कंत्राटी तत्वावर १ ठोक मानधन रु. १५,०००/- प्रमाणे करार पद्धतीने खालील अटी व शर्तीनुसार सेवा प्राप्त करून घेण्यासाठी दि. १८/०५/२०२२ रोजी थेट मुलाखत (Walk in Interview) आयोजित केली आहे. इच्छुक उमेदवारांनी दि. १८/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता वासुदेव बळवंत फडके, नाट्यगृह, पनवेल येथे आपली मूळ कागदपत्रे व अनुषंगिक कागदपत्र घेऊन स्वत: हजर राहावे. सविस्तर जाहिरात महापालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| भरती करावयाचे पद | अनुभव | शैक्षणिक अर्हता | ठोक मानधन |
|---|---|---|---|
| दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) केंद्रशासन पुरस्कृत अभियानांतर्गत **''समुदाय संघटक''** | दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत माहिती असणे आवश्यक. | १. उच्च माध्यमिक म्हणजे (१०+२) कोणत्याही विषयातील १२वी परीक्षा पास असणे आवश्यक (BSW/MSW असल्यास प्राधान्य) २. MS Office (Word, Excel, Power Point etc.) मध्ये प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. ३. उमेदवारास समुदयाच्या सामाजिक विकास या क्षेत्रात काम केलेल्याचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | रु. १५,०००/- |

**अटी व शर्ती :-**
१. करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.
२. सदरचे पद हे पनवेल महानगरपालिकेतील दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कार्यान्वयीत करणेसाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. एनयूएल-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-३३ दि. २८/०८/२०१८ मधील तरतुदीप्रमाणे कंत्राटी तत्वावर अकरा महिन्याच्या कालावधीसाठी भरावयाचे असल्याने सदर अकरा महिन्याच्या कालावधीतील कामकाज समाधानकारक आढळल्यास, एक दिवसाचा खंड देऊन पुढील अकरा महिन्यासाठी नेमणूक देण्याबाबत विचार करण्यात येईल.
३. वयोमर्यादा १८ ते ४५ वर्ष / सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत काम केलेल्या उमेदवारांसाठी ५ वर्ष शिथिल असतील.
४. दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त होणाऱ्या अनुदानामधून नेमणूक केलेल्या उमेदवारास दरमहा ठोक वेतन देणेत येईल.
५. उपरोक्त पदावर हजर होतांना विहित करणेत आलेली शैक्षणिक अर्हतेसंबंधीचे मूळ कागदपत्रे व त्याचे दोन छायांकित प्रतीचे संच सादर करावेत, सादर केलेली कागदपत्रे चुकीची व दिशाभूल करणारी आढळल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करून नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
६. आपले काम समाधानकारक नसल्यास आपली कंत्राटी सेवा आगाऊ नोटीस देऊन समाप्त करणेचे अधिकार मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना राहील. तसेच आपणांस सेवा समाप्त करावयाची असल्यास आगाऊ एक महिन्याची नोटीस देणे बंधनकारक राहील.
७. कंत्राटी सेवेने नियुक्ती असल्याने राष्ट्रीय सुट्ट्या व साप्ताहिक सुट्ट्या अनुज्ञेय असतील. परंतु महानगरपालिकेस आवश्यकता असल्यास सदर दिवशी देखील काम करणे बंधनकारक राहील. याचा कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त मोबदला देण्यात येणार नाही.
८. आपल्या सेवा करारबाबत कोणताही वाद उद्भवल्यास मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील. तसेच कोणताही न्यायिक वाद हा पनवेल क्षेत्र न्यायालयाच्या हद्दीत करणे बंधनकारक राहील.
९. नियुक्तीसाठी सक्षम असलेल्या प्राधिकरणाने विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा कर्मचाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.
१०. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल. अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.
११. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.
१२. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस प्राप्त होणाऱ्या अधिकाराअंतर्गत येणारे आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्री याबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
१३. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांच्यावर सोपविलेले कामकाज, निश्चित केलेल्या विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन करतील.
१४. उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

सही/-
सहाय्यक आयुक्त (आस्थापना)
पनवेल महानगरपालिका






**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. ७ मे २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

**ग्रामीण लसीकरण**

■ कोपरा ■ धोंगऱ्याचा पाडा ■ पिसार्वे ■ कळंबोली ■ पापडीचा पाडा/पेठाली ■ रोडपाली

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. १८.०४.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये वयोगट १२-१४ यांस कार्बेव्हॅक्स व १५ ते १८ वयोगटातील लाभार्थ्यांसाठी कोव्हॅक्सिन लस उपलब्ध असणार आहे.**

**Precautionary Dose बाबत माहिती**

- शासकीय कोविड लसीकरण केंद्रांमध्ये ६० वर्ष वरील नागरिकांना, तसेच FLW, HCW यांना दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या लाभार्थ्यांना Precautionary Dose पूर्वीप्रमाणेच उपलब्ध होणार आहे.
- दि. १०.०४.२०२२ पासून सर्व खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये १८-५९ वर्ष (Year of birth 1963-2004) वरील नागरिकांचे दुसरा डोस घेऊन ९ महिने (३९ आठवडे/२७३ दिवस) झालेल्या नागरिकांना Precautionary Dose उपलब्ध होणार आहे.
- खासगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये लसीकरण **सशुल्क** असणार आहे.
- **१८-५९** वय नागरिकांचे Precautionary Dose हे **फक्त खाजगी कोविड लसीकरण केंद्रांमध्ये** उपलब्ध असेल.
- या लसीकरणाकरीता **कुठलेही नवीन रजिस्ट्रेशन** करण्याची आवश्यकता नाही.
- **१८-५९** वय नागरिकांचे Precautionary Dose च्या लाभार्थ्यांनी दुसऱ्या डोसचे सर्टिफिकेट/दुसरा डोस घेताना वापरलेला ID Proof व दुसऱ्या डोसकरीता दिलेला मोबाईल नंबर लसीकरण केंद्रावर सोबत घेऊन जावा.
- या लसीकरीताची शुल्क रु. २२५+GST + रु. १५० पर्यंत सर्विस शुल्क शासनाने ठरविले आहे.
- नागरिकांना लस घेताना पहिले दोन डोस ज्या लसीचे घेतले आहेत तीच लस Precautionary Dose साठी घ्यावी लागणार आहे.
- लाभार्थ्यांना कोविन ॲपवर कोणत्या खासगी लसीकरण केंद्रांवर लसीकरण सुरु आहे हे दिसणार आहे. त्याप्रमाणे कोविनवर Online Booking करुन किंवा प्रत्यक्ष लसीकरण केंद्रांवर देखील Booking करुन लस घेता येईल.





# व्यायाम हा आयुष्यातील महत्त्वाचा घटक

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; उलवे नोडमध्ये योगाभ्यास केंद्राचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर १७ येथे उलवे नोड भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा यांच्या माध्यमातून महिलांसाठी योगा अभ्यास केंद्र बांधण्यात आले आहे. या केंद्राचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी उद्घाटन झाले. या वेळी त्यांनी व्यायाम हा आयुष्यातील महत्त्वाचा घटक आहे असे प्रतिपादन करून महिला मोर्चाच्या कामाचे कौतुक केले.

उलवे नोडमध्ये वाढत्या नागरीकरणासोबत अनेक सुविधा उपलब्ध होत आहेत. त्याअंतर्गत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पुरस्काराने आणि भाजप महिला मोर्चा उलवेनोड महिला मोर्चातर्फे योगा अभ्यास केंद्र बांधण्यात आले आहे. या केंद्राचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उद्घाटन केले.

या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल पंचायत समिती सदस्या तथा भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, वहाळ ग्रामपंचायत सदस्य वितेश म्हात्रे, मंजुळा कोळी, गीता ठाकूर, माजी सदस्या इंदू घरत, जयश्री कोळी, अनंता ठाकूर, वसंतशेठ पाटील, सुधीर ठाकूर, जयवंत देशमुख, अजय भगत, किशोर पाटील, व्ही. के. ठाकूर, सुनील पाटील, अंकुश ठाकूर, विशाल म्हात्रे, विलास साळवे, नवनाथ जाधव, दिलीप चव्हाण, ज्ञानेश्वर म्हात्रे, संतोष भगत, अवदेश म्हात्रे, शेखर काशी, सुजाता पाटील, नितीन गाडीया, दिपा मौर्या, अर्चना मिश्रा, राजेश रणदिवे, प्रणय कोळी, सुहास भगत, अशीष घरत, आयोजक उलवे नोड महिला मोर्चा अध्यक्षा योगीता भगत, उपाध्यक्ष सुजाता पाटील, मीना म्हात्रे, शुभांगी पाटील, महिला पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी या योगाभ्यास केंद्राचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# भोकरपाडा येथे विकासकामांचा शुभारंभ

## भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन व उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या माध्यमातून उरण तालुक्यातील भोकरपाडा गावामध्ये रस्त्याच्या डांबरीकरणाचे भूमिपूजन आणि बसथांब्याचे लोकार्पण पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ६) झाले.





या वेळी त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या दमदार नेतृत्वाने तालुक्यात विकसाची गंगा वाहत आहे, असे प्रतिपादन केले. भोकरडपाडा येथे आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीमधून ५ लाखांच्या रस्ता डांबरीकरणाचे भूमिपूजन संपर्क पोयंजे प्रमुख सचिन दुर्गे आणि युवामोर्चा अध्यक्ष गणेश आगिवले आणि गाव अध्यक्ष महेंद्र पाटील पाटील यांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या बसथांब्याचे लोकार्पण झाले. या वेळी गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, कसळखंडचे माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, पोयंजे विभागीय अध्यक्ष प्रवीण ठाकूर, पोयंजे विभागीय संपर्क प्रमुख सचिन दुर्गे, अविनाश पडवळ, बारवईचे माजी सरपंच जगन पाटील, भोकरपाडाचे माजी सरपंच काशिनाथ पाटील, जितेंद्र पाटील, ग्रा. पं. सदस्या वनिता पाटील, सदस्य वैशाली आगिवले, माजी उपसरपंच रमेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील, पोलीस पाटील दत्तात्रेय पाटील, माजी ग्रा. पं. सदस्य तुकाराम ठाकूर, महिला बचतगट अध्यक्षा माधुरी दुर्गे, बारवई पोलीस पाटील संतोष बाबरे, ज्येष्ठ कार्यकर्ते बारकू पाटील, बबन मोरे, शैलेंद्र पाटील, संजय ठोंबरे, संदीप शिंदे, प्रकाश पाटील, विनोद शिंदे, राहुल पाटील, तुकाराम ठाकूर, राम पाटील, संतोष आगिवले, अनंत दुर्गे, पद्माकर पाटील, सुशांत मालकर, रोहित ठाकूर, हेमंत शिंदे, जितेश आगिवले, प्रवीण पाटील, राजू पाटील, गणेश पाटील, नितेश पाटील, वामन पाटील, नितीन हंगे, सुभाष पाटील, अनिल मोरे, कुमार आगिवले, जयेश पाटील, मनोहर पाटील, संतोष पाटील, चेतन पाटील, समीर दळवी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.





कामोठ : श्री गावदेवी मंदिराच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त जुई गावात गुरुवारी कराडी समाज महिला मंडळातर्फे आयोजित सत्यनारायण महापुजेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी भाजप कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी, माजी सरपंच भाऊ भगत, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, भाजप नेते रवि गोवारी, धनाजी पाटील, अरुण गोवारी, गिरीश चिमणे, पंडित चिमणे, प्रशांत चिमणे, ॲड. विशाल मुंडकर, ॲड. आशा भगत आदी उपस्थित होते.

## खारघरमधील पाणीप्रश्नी भाजपचे आंदोलन













खारघर : येथील अनियमित व अपुऱ्या पाणीपुरवठ्याबाबत भाजपतर्फे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## सायन-पनवेल महामार्गावर प्रवाशांना थंडावा

# नीरा भागवतेय तहान!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एप्रिल महिन्याच्या अखेरपासून उन्हाचा पारा चढल्याने नागरिकांनी शीतपेयांचा आधार घेतला आहे. वाढत्या उन्हामुळे लिंबू पाणी, नारळ पाणी, ऊसाचा रस, ताक या शीतपेयांची मागणी वाढली आहे. या शीतपेयांबरोबरच सायन–पनवेल महार्गावरील वाशी ते खारघर–पनवेल महामार्गावर बाहेर जाणाऱ्या वाहनचालकांची नीरा पिण्यासाठी गर्दी वाढत आहे.




(प्रातिनिधीक छायाचित्र)

एप्रिल महिन्याच्या अखेरपासून उन्हाचा पारा चढल्याने नागरिकांनी शीतपेयांचा आधार घेतला आहे. वाढत्या उन्हामुळे लिंबू पाणी, नारळ पाणी, ऊसाचा रस, ताक या शीतपेयांची मागणी वाढली आहे. उन्हासोबत तापलेल्या रस्त्याचे चटके बसत असल्याने हैराण झालेल्या नागरिकांची सध्या सुमधूर नीरा तहान भागवत आहे.

> **अवघ्या १० रुपयांत नीरा सामान्यांची तहान भागवत आहे. भारतात विशेषत: महाराष्ट्रातील कोकणाची ओळख असलेल्या नीरा पेयालादेखील सरकारने अनुदान देऊन हा पारंपरिक व्यवसाय करणाऱ्यांना मदतीचा हात देण्याची गरज आहे.**
> **–आशाताई कुरणे, नीरा विक्रेत्या**

ताड, माड, खजुरी, शिंदी या झाडांमधून पाझरणारा नीरा पोषक आणि उपायकारक आहे. नीरा म्हणजे अनेकांना ही ताडी अथवा माडी म्हणजे नशा आणणारे पेय वाटते. त्यामुळे नव्याने पिणारे अनेक जण काहिसे संशयानेच त्याकडे पाहतात मात्र एकदा मधुर निरेचा घोट पोटात गेला की, नाही म्हणणारा ग्राहक हक्काने दोन ग्लास जादा पितो इतके हे पेय लज्ञतदार आणि शरीराला तजेला देणारे आहे.

कोकणात हे पेय जास्त प्रमाणात आढळते. सर्वत्र शीतपेय, सरबत, लस्सी, ताक यासारखे तहान भागविण्याचे अनेक पर्याय सहज उपलब्ध होऊ लागल्याने काळाच्या ओघात या केंद्रांची संख्या मात्र खूपच कमी होत गेली होती, मात्र सायन–पनवेल या महाराष्ट्रातील सर्वाधिक वर्दळीच्या महामार्गावर शासनाने नीरा विक्री करण्यास दिलेल्या मुभेमुळे या नीरा विक्रेत्यांना सुगीचे दिवस आले आहेत.

## रेल्वेच्या धडकेने वृद्ध महिलेचा मृत्यू

**पनवेल** : बेलापूर ते पनवेल रेल्वे स्टेशनदरम्यान रेल्वे लाईन क्रॉस करताना रेल्वेची धडक लागून एका ६० वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या महिलेबाबत कोणतीही माहिती नसल्याने पोलीस या महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. २५ एप्रिल रोजी ही वृद्ध महिला रेल्वे लाईन क्रॉस करीत असताना बेलापूर ते पनवेल दरम्यान तिला रेल्वेची धडक लागून ती जखमी झाली. तिला उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र त्याआधीच तिचा मृत्यू झाला होता. या महिलेची उंची अंदाजे ४ फूट ८ इंच, अंगाने सडपातळ, डाव्या हातावर अस्पष्ट गोंदलेले व अंगात मळकट सफेद हाफ शर्ट व फिक्कट भगवी लुंगी परिधान केली आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



पनवेल : भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी खैरवाडी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच जनार्दन कोळंबेकर (कोंडले) यांना वाढदिवसानिमित्त शुक्रवारी पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या. भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला रवींद्र पाटील, रामदास शिंदे, गुलाब चौधरी, हरिश्चंद्र खंडागळे, दिगंबर साठे आदी उपस्थित होते.

# सिकंदर सय्यद यांना ग्लोबल नॅशनल अवॉर्ड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

साई सोशल ॲंड स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने ग्लॅमर फेस ऑफ महाराष्ट्र २०२२ हा कार्यक्रम पुणे येथील सिम्बायोसिस इंटरनॅशनल कॉलेजमध्ये मोठ्या दिमाखात पार पडला.

यात चित्रपट सृष्टीत काम करत असतानाच सामाजिक कार्य करणाऱ्या सिकंदर सय्यद यांच्या समाजकार्याची दखल घेऊन त्यांना ग्लोबल सोशल अवार्ड देवून सन्मानित करण्यात आले. या वेळी अखिल भारतीय मराठी चित्रपट अध्यक्ष मेघराजे भोसले, अभिनेता फिरोज खान, दिपाली खमर एसीपी सुनील हिरुरकर, बॉबी कर्नारी आदी उपस्थित होते. सिकंदर सय्यद यांनी चित्रपट सृष्टीत पाऊल टाकून भुईमूगाच्या शेंगा मराठी चित्रपट काढून चित्रपट सृष्टीत पाय रोवले. त्यांना ग्लोबल नॅशनल अवार्डने सन्मानित केल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## संपादकीय

# झटक्यावर झटके

भाजपचे नेते वा समर्थक यांना न्यायालयात दिलासा मिळतो, पण महाविकास आघाडीच्या नेत्यांवरील आरोप सिद्ध होतात. हे कसे, असा सवाल शिवसेनेचे प्रवक्ता संजय राऊत यांनी शुक्रवारी उघडपणे विचारला. परंतु या प्रश्नाचे उत्तर खुद्द राऊत यांनाही ठाऊक असेल. महाविकास आघाडीच्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि त्याचे पुरावे देखील तपास यंत्रणांच्या हाती लागले. याउलट भाजप समर्थकांच्या विरोधात दाखल करण्यात आलेले गुन्हे राजकीय सूडबुद्धीतून झालेले होते. या देशातील न्यायालये डोळे बांधून बसलेली नाहीत. परिस्थितीजन्य पुराव्याचा योग्य अन्वयार्थ लावून निष्पक्षपातीपणाने न्याय दिला जातोच.

**संजय राऊत यांना गेले काही महिने सर्वत्र घोटाळेच घोटाळे दिसत आहेत. वास्तविक त्यांच्या प्रयत्नांनी सत्तेवर आलेले महाविकास आघाडीचे सरकार पहिल्या दिवसापासूनच घोटाळ्यांच्या आरोपांनी कलंकित झाले आहे. सत्तेवर आल्या-आल्या या मंडळींनी जी जनतेची लूटालूट सुरू केली, ती पाहता भाजपसारखा खंदा विरोधी पक्ष गप्प बसणे शक्यच नव्हते. भाजपच्या नेत्यांनी पुराव्यानिशी, कागदपत्रांसहित सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांवर आरोप केले. परिणामी आजच्या घडीला दोन ज्येष्ठ नेते तुरुंगाची हवा खात आहेत आणि अर्धा डझन मंत्री व नेते कारागृहाच्या वाटेवर आहेत. त्यामुळेच राऊत यांनी उपस्थित केलेला प्रश्न रास्तच म्हणावा लागेल. भाजप नेते किंवा भाजपच्या समर्थकांना जामीन मिळतो आणि महाविकास आघाडीचे नेते तुरुंगात जातात हे त्यांचे निरीक्षण योग्यच आहे. अमरावतीचे रवी आणि नवनीत राणा हे आमदार-खासदार दाम्पत्य १२ दिवस तुरुंगात डांबले गेले होते. त्यांच्यावर आरोप होता राजद्रोहाचा. सत्र न्यायालयाने मात्र या दाम्पत्यास जामीन मंजूर करताना राजद्रोहाचा आरोप लावणे चुकीचे असल्याचे निरीक्षण स्पष्टपणे नोंदवले. एखाद्याने सत्तेच्या विरोधात आक्षेपार्ह विधान केले म्हणून त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप करता येत नाही. अशा प्रकारच्या विधानानंतर जातीय तेढ वाढून हिंसाचार झाला तर कदाचित राजद्रोहाचा मामला उभा राहू शकतो. परंतु मुंबई पोलिसांनी वरिष्ठांची मर्जी राखत राणा दाम्पत्यावर राजद्रोहासह अनेक कलमे लावली. सत्र न्यायालयाने मात्र सूडबुद्धीचे हे राजकारण ओळखून न्यायदान केले. भारतीय जनता पक्ष हा न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवणारा तसेच लोकशाहीची मूल्ये मानणारा पक्ष आहे. त्याचे पुरावे अनेक वेळा मिळाले आहेत. महाविकास आघाडी सरकारने मात्र केवळ सुडाचे राजकारण सुरू ठेवले आणि जशाच तसे उत्तर देण्याच्या नादात बेकायदेशीर कारवाया केल्या. सत्ताधारी ठाकरे सरकारने घेतलेले कित्येक निर्णय न्यायालयात टिकू शकले नाहीत. यावरूनच सत्ताधाऱ्यांचे इरादे स्पष्ट होतात. जामीन मिळाल्यानंतर खासदार नवनीत राणा यांना खासगी इस्पितळात उपचारार्थ दाखल व्हावे लागले. गेल्या सहा दिवसांपासून त्या प्रकृतीसंदर्भात तक्रार करत होत्या. न्यायालयाचे निरीक्षण वेगळे आणि निकालपत्र वेगळे असा दुबळा युक्तिवाद या प्रकरणासंदर्भात शिवसेना नेते व मंत्री अनिल परब यांनी केला आहे खरा. परंतु आपल्या युक्तिवादामध्ये काहीच दम नाही हे त्यांनाही कळले असेल. राणा दाम्पत्याला जामीन मंजूर झाल्यानंतर सत्ताधारी आघाडीतील नेत्यांची तोंडे बघण्यासारखी झाली होती. हनुमान चालीसा सार्वजनिकरित्या म्हणण्यास आडकाठी करण्याचा अधिकार पोलीस प्रशासनाला आहे हे खरे, परंतु त्याबद्दल राजद्रोहाचा खटला दाखल करणे हा अतिरेक झाला.**

# द्रष्टे नेते स्व. जनार्दन भगत

स्व. जनार्दन आत्माराम भगतसाहेब म्हणजे माझे आबा. त्यांच्या ३४व्या पुण्यतिथिनिमित्त त्यांना अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देत आहे.

माझे आबा म्हणजे सुसंस्कारांचा खजिना, मायेचा जिवंत झरा, दीन-दुबळ्यांचे आधारस्तंभ, गोरगरिबांचे कनवाळू. जेव्हा माझे आबा काळाच्या पडद्याआड गेले तेव्हापासून वियोगाची स्पंदने आजही आठवतात. आज त्यांनी मोठी संपती जरी मागे ठेवली नसली तरी आपल्या कर्तृत्वाची शिदोरी आम्हाला दिली आहे. स्वतःचे शिक्षण कमी असूनसुद्धा शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ही खूणगाठ त्यांनी मनाशी बांधून शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचवली. म्हणून त्यांच्या विचारांतून व तळमळीतून त्यांच्याच नावाच्या शिक्षण संस्थेचा जन्म झाला आणि आज महाराष्ट्रातच नव्हे तर भारताच्या कानाकोपऱ्यात जनार्दन भगत शिक्षक प्रसारक संस्थेचे नाव सर्वमुखी आहे. मला आठवतेय माझ्या लहानपणी आमचे घर म्हणजे समाजसेवेचे अतिमहत्त्वाचे स्थान बनले होते. तेव्हा लोकांचे शिक्षण कमी असल्यामुळे जमीन-जुमला, एकमेकांचे हेवेदावे, राजकीय गट यामुळे भांडणतंट्यांना परिसीमाच नव्हती. वाद मिटविण्यासाठी लोक आमच्या घरी येत असत, पण माझ्या आबांचे समाजामध्ये असलेले स्थान व आदरयुक्त दरारा लोकांच्या मनात घर करून बसला होता. त्यामुळे गावागावांतील भांडणाला पूर्णविराम मिळण्यासाठी आबांच्या रूपाने शांतीदूताचे महान कार्य घडत होते. ते माझ्या बालमनाला स्पर्श करून जात होते.

जगाचे कल्याण संतांच्या विभूती या उक्तीप्रमाणे आबांच्या पुरोगामी विचारधारेचा प्रभाव लोकांवर पडल्याने गावागावातील भांडणे मिटून शांततेचा संदेश समाजाला मिळत होता. आबांच्या विचारांची पकड समाजावर पडली होती. त्या वेळी समाजामध्ये असणाऱ्या वाईट रूढी, परंपरा, चालीरीती, अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी आबांकडून प्रयत्न होत होते. त्यातच लग्नसमारंभात हळदी समारंभावर होणाऱ्या खर्चावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला. देव माणसात शोधा, देवळात नाही हे पटवून देण्यासाठी ते कधीही देवळात गेले नाही. त्यांनी लोकांची सेवा करणे पसंत केले, तसेच देव प्रसन्न होण्यासाठी कधीही उपवास केला नाही. अशा प्रकारे त्यांनी स्वतःच्या कृतीतून आदर्श घालून दिला. एकदा काय झाले, साताऱ्यातून पनवेल परिसरात नव्यानेच आलेला एक जण इथे सर्व दुःखांवर जालीम इलाज करणाऱ्या भगताची चौकशी करीत होता. हा भगत आपले जीवन बदलून टाकणार व चमत्कार नक्कीच करणार म्हणून तो मोठ्या आशेने दूरवरून आला होता. चौकशी करताना त्याची गाठ अखेर त्या भगताशी झाली आणि तो अवाक् झाला. कारण त्याला भेटलेला भगत कोणत्याही अंगाऱ्या धुपाऱ्याशिवाय आणि गंड्यादोऱ्यांशिवाय शेकडो लोकांची आयुष्ये क्षणार्धात बदलत होता. ईश्वरी कृपेने स्वतःच्या कर्तृत्वाने अशी अफाट क्षमता स्वतःच्या ठायी बाळगणारे ते अद्वितीय आणि असामान्य व्यक्तिमत्त्व म्हणजे स्व. जनार्दन आत्माराम भगत अर्थात माझे आबा.

आमच्या पूर्वजन्मीच्या पुण्याईचे फळ म्हणून मला त्यांचा जैविक, सामाजिक, भौतिक आणि आध्यात्मिक वारसा चालविण्याची संधी मिळाली. त्यांचा मुलगा म्हणूनच नव्हे, तर एक जबाबदार आणि सुसंस्कृत नागरिक म्हणूनही या गोष्टीची जाणीव मला सतत राहिली आहे. आम्ही लहान होतो तेव्हापासून आबांच्या कामाची पद्धत मी पाहत आलो आहे. सामान्याहूनही अतिसामान्य होण्याच्या त्यांच्या वृत्ती आणि कौशल्यातून त्यांनी एक एक माणूस नुसता जोडलाच नाही, तर जगवला आणि वाढवला देखील. आपल्याकडे असलेली सगळी सत्ता आणि संपदा त्यांनी जास्तीत जास्त सामान्य माणसाच्या कल्याणासाठी वापरली आणि म्हणूनच गोरगरीब जनतेचा ओढा त्यांच्याकडे राहिला. सकाळ-संध्याकाळ आमच्या घराच्या ओटच्यावर आम्ही लहानपणापासून पाहिलेली गर्दी हे त्याचेच प्रतीक होते हे आम्हाला आज प्रकर्षाने कळते.



आबांनी अनेक आंदोलने केली. दिग्गजांबरोबर तुरुंगवासही भोगला, मात्र त्याचे कधी भांडवल करण्याचा करंटेपणा केला नाही. म्हणूनच आम्ही आज त्या पुण्याईचा झेंडा अभिमानाने मिरवू शकतो. कोणता गुण त्यांच्यात नव्हता? अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, आदर्श शेतकरी, सुसंस्कृत माणूस, निडर आंदोलक, हाडाचा समाजसेवी आणि एक आदर्श पिता व पतीदेखील. आजच्या जगातील विविध वृत्ती आणि प्रवृत्तीचे संकुचित आणि स्वकेंद्रित लोक दिसले की त्यांचे हे विविधांगी व्यक्तिमत्त्व अधिकच ठळक होते.

समाजाचा विचार करणे वेगळे आणि त्यासाठी त्या विचारांना प्रत्यक्षात आणणे वेगळे. आबांनी या दोन्ही गोष्टी केल्या. अंधश्रद्धा निर्मूलनाचे भाषण देणे वेगळे आणि ते विचार, तो दृष्टिकोन जगणे वेगळे. आबांनी या सर्व गोष्टी अमलात आणल्या. हटकून प्रसंगी एकादशीलाही मांसाहार करण्यामागची वैचारिक बैठक समजणं सामान्य माणसाच्या आवाक्यात आजही नाही. त्या वेळी ते किती कठीण असेल? हे लक्षात घेतलं की आबांचा विज्ञान, निर्भयता आणि नीती अंधश्रद्धा निर्मूलन अजेंडा हे कसे प्रत्यक्षात आणत असत हे समजतं. कॉलेजात असताना मी एक संप पुकारला. मागण्या मान्य होत नव्हत्या. प्राचार्य हे आबांना चर्चेत सहभागी करून घेणार होते. तेव्हा त्या भीतीने मी संप गुंडाळला, पण माझ्या या बंडाबद्दल आबांनी मला दोष न देता उलट त्याचं समर्थनच केलं. लोकशाही व्यवस्थेत स्वतःवरील अन्यायाविरोधात निःशस्त्र तरीही निर्भीडपणे दाद मागण्यासाठीचा एक मार्गही वापरला ही त्यांच्यासाठी एक आनंदाचीच बाब होती. हेच त्यांच्या प्रतिक्रियेतून मला कळले. समाजाला नुसते उपदेशाचे डोस नको असतात. ते देणाऱ्यांना समाज एका मर्यादेपर्यंतच सहन करतो. वेळ आली की असे उपदेश देणारे सामाजिक नव्हे तर व्यक्तिगत जीवनातही टाकाऊच ठरतात. इतक्या वर्षांनंतर आबांच्या व्यक्तीरेखेबद्दल अनेकांना जो आदर दिसतो, त्यातून त्यांनी आपले जीवन कसे अमर आणि अजातशत्रू बनविले होते ते आम्हाला कळते आणि आपण अशा थोर व्यक्तीला त्याचा वारस म्हणून न्याय देण्याच्या नुसत्या कल्पनेनेच आत्यंतिक पण स्वाभाविक दडपण जाणवते, परंतु हे दडपणही आम्ही अभिमानाने मिरवले आणि आजवर त्यांचे विचार जगण्याचा पूर्ण प्रयत्न केला.

आबांच्या सामाजिक आणि राजकीय वलयाचा गैरफायदा न घेता एक विज्ञान शिक्षक म्हणून अनेक वर्षे मी काम केले ते या प्रयत्नांचा भाग म्हणूनच. अनेक संधी समोर असताना आबांच्या विचारानुसार देशाला वैज्ञानिक दृष्टी असणारा समाज प्रदान करण्याचे माध्यम म्हणून शिक्षण क्षेत्राची निवड केली. त्यामागे हीच जाणीव होती की समाजाचा खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास करावयाचा असेल, तर शिक्षण हेच एकमेव औषध आहे. या भावनेतून आबांनीही शिक्षणक्षेत्रात काम केले. त्याचा अवाढव्य विस्तार स्व. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाच्या अनेक विद्यासुंकुलांच्या रूपाने आपल्याला दिसत आहे. आज पुण्यतिथीच्या निमित्ताने आबांबद्दल भावना आणि विचार मला समाजातील अनेक घटकांपर्यंत एकाचवेळी पोहचविता आल्याचा आनंद वाटतो. आबा अर्थात स्व. जनार्दन भगत यांच्या नावाने सुरू असलेला हा शिक्षणयज्ञ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अविरतपणे पुढे चालू ठेवण्याचे कार्य आपण सर्व जण करीत आहात, त्यात माझा नेहमीच सक्रिय सहभाग राहील. धन्यवाद!

**-संजय भगत**



## बदलते तंत्रज्ञान

### अँड्रॉईड युजर्ससाठी मोठा दिलासा

अँड्रॉईड युजर्ससाठी मोठी बातमी आली आहे. आता कॉल रेकॉर्ड करण्यासाठी वापरू शकणार नाही थर्ड पार्टी ॲप्स कॉल रेकॉर्ड करण्यासाठी जर का तुम्ही थर्ड पार्टी ॲपची मदत घेत असाल, तर काही दिवसांनी तुम्ही तसे करू शकणार नाही. कारण गुगल नवीन धोरण अँड्रॉईड स्मार्टफोन्सवरील थर्ड पार्टी कॉल रेकॉर्डिंग ॲप्सवर कडक कारवाई करणार आहे. रिपोर्ट्सनुसार, ११ मे पासून ॲप डेव्हलपर थर्ड पार्टी ॲप्सद्वारे कॉल रेकॉर्डिंग फीचर प्रदान करू शकणार नाहीत. कंपनीने अलीकडेच आपल्या प्ले स्टोअर धोरणात काही बदल केले आहेत.



त्यापैकी एक अँड्रॉईडवर कॉल रेकॉर्डिंग ॲप्स बंद करणे हा आहे. नवीन धोरणानुसार, ॲप्सना यापुढे प्ले स्टोअरवर कॉल रेकॉर्डिंगसाठी वापरण्याची परवानगी नाही. गेल्या काही महिन्यांपासून गुगलने कॉल रेकॉर्डिंग सुरू होताच यूजर्सना अलर्ट द्यायला सुरुवात केली होती आणि आता बातमी अशी आहे की, कंपनी ते पूर्णपणे बंद करणार आहे. Reddit वापरकर्त्यांच्या दाव्यानुसार, गुगल लवकरच एक अपडेट जारी करेल, ज्यानंतर अँड्रॉईड फोनमध्ये कॉल रेकॉर्डिंग बंद केले जाईल. कॉल रेकॉर्डिंग फिचर आयफोनमध्ये नाही. गुगलने कॉल रेकॉर्डिंग बंद करण्याचा प्रयत्न करण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी Android १० सह, Google ने त्यांच्या फोनमधून कॉल रेकॉर्डिंग फिचर काढून टाकले होते. गुगलचे म्हणणे आहे की, यूजर्सची गोपनीयता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने फोनमध्ये कॉल रेकॉर्डिंग असणे योग्य नाही. आता Android स्मार्टफोन वापरकर्ते इन बिल्ट कॉल रेकॉर्डरशिवाय स्मार्टफोन वापरत आहेत ते ११ मे नंतर कॉल रेकॉर्ड करू शकणार नाहीत. माहितीसाठी, Samsung, OnePlus अशा सर्व कंपन्यांच्या फोनमध्ये इनबिल्ट कॉलिंग रेकॉर्डिंग सुविधा उपलब्ध आहे. WhatsApp Voice Call रेकॉर्ड करण्यासाठी 'या' सोप्प्या स्टेप्स फॉलो करा. तसेच अँड्रॉईड ही एक ऑपरेटिंग सिस्टम आहे जी मोबाइलला डोळ्यासमोर ठेवून डिझाइन केली आहे. जेणेकरून फोनमधील सर्व फंक्शन्स आणि Applications त्यामध्ये सहजपणे चालू करता येतील. फोनच्या Display वर आपण जे काही पाहता ते सर्व ऑपरेटिंग सिस्टमचा भाग आहेत. जेव्हा जेव्हा आपल्याला कॉल, मजकूर संदेश किंवा ईमेल मिळेल तेव्हा ओएस त्यावर प्रक्रिया करतो आणि तो आपल्यास वाचनीय स्वरूपात सादर करतो.

# नाट्यअभिनेते आत्माराम भेंडे यांच्या कार्याचा आढावा

मराठी नाट्यअभिनेते, दिग्दर्शक आत्माराम भेंडे यांचा दि. ७ हा स्मृतिदिन असून या निमित्ताने त्यांचा हा अल्प परिचय...



४ मे १९२३ रोजी आत्माराम भेंडे यांचा जन्म झाला. सहा दशकांहून अधिक काळ अभिनयाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या आत्माराम भेंडे यांनी इंडियन नॅशनल थिएटरमधून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. आपल्या सहजसुंदर अभिनयाने मराठी रंगभूमी, सिनेसृष्टी, बॉलिवूड, जाहिराती, इंग्लिश नाटके आणि मालिकांमधून रसिकांना निखळ आनंद देणारे, त्यांच्या मनात प्रेमाचे आदराचे स्थान मिळवणारे आत्माराम भेंडे यांनी, 'एक सुसंस्कृत विनोदी अभिनेते' म्हणून स्वतःचा ठसा उमटवला होता. रसिकांना हसवण्यासाठी अंगविक्षेप किंवा कुठलाही थिल्लरपणा करायची गरज नसते, तर चेहऱ्यावरचे हावभाव, शब्दफेक आणि टायमिंगमधून उत्तम विनोदनिर्मिती करता येते, हे त्यांनी दाखवून दिलं होते. रंगभूमी, सिनेमा, जाहिराती, मालिकांमध्ये ते अगदी लीलया वावरले होते. फक्त अभिनेते म्हणूनच नव्हे, तर दिग्दर्शक आणि निर्मात्याची जबाबदारीही त्यांनी समर्थपणे पेलली होती. अलीकडच्या काळात त्यांच्या चरित्र भूमिका रसिकांना भावल्या. तरुणाईला तर ते आपल्या घरातले आजोबाच वाटले. 'लगे रहो मुन्नाभाई' मध्ये त्यांनी साकारलेला 'आत्माराम' सगळ्यांच्याच काळजाला भिडला होता. १९६०-७० च्या दशकात लेखक बबन प्रभू आणि दिग्दर्शक आत्माराम भेंडे जोडीने मराठी रंगभूमीला फार्सिकल नाटकांची ओळख करून दिली आणि रसिकांना अगदी खळखळून हसवलं.

दिनूच्या सासूबाई राधाबाई, झोपी गेलेला जागा झाला, पिलूचं लग्न ही त्यांची नाटके तुफान गाजली होती. मन पाखरू पाखरू, प्रीती परी तुजवरी, तरुण तुर्क म्हातारे अर्क, तुज आहे तुजपाशी, पळा पळा कोण पुढे पळे अशा नाटकांमधून भेंडेंनी आपल्या अभिनयाची ताकद दाखवून दिली होती.

मराठीसोबतच हिंदी, इंग्रजी आणि हिंग्लिश नाटकांमधूनही आत्माराम भेंडेंनी दर्जेदार काम केले होते. दूरदर्शनसाठी अनेक मालिकांचे दिग्दर्शन केले होते. जाहिरातींमध्ये अभिनय करण्याचे आव्हानही त्यांनी उतारवयात स्विकारले आणि तेही यशस्वी करून दाखविले. काही वर्षांपूर्वीच्या 'यंदा कर्तव्य आहे' या सिनेमात त्यांनी आजोबांची छोटेखानी भूमिका एकदम चोख बजावली होती. कलाक्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल भेंडेंना नाट्यदर्पण, शंकरराव घाणेकर, नाट्यभूषण, चिंतामणराव कोल्हटकर, नटसम्राट नानासाहेब फाटक, प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव या मानाच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आले होते. १९८१ मध्ये नाशिकला झालेल्या ६१व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही भेंडेंनी भूषवले होते. भेंडे यांना २००७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्य सांस्कृतिक राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. दरम्यान, 'दिनूच्या सासूबाई राधाबाई' आणि 'झोपी गेलेला जागा झाला' या नाटकांद्वारे रसिकमनांवर मोहिनी घालणारे, चित्रपट, दूरदर्शन मालिका आणि जाहिरातींमधील आपल्या अभिनयाने मराठी रंगभूमीवर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ अभिनेते आत्माराम भेंडे यांचे सात फेब्रुवारी २०१५ रोजी निधन झाले. पत्नी अभिनेत्री आशा भेंडे आणि मुलगा संगीतकार नंदू भेंडे यांच्या निधनानंतर आत्माराम भेंडे एकाकी झाले होते. काही वर्षांपासून ते पाषाणमधील अथश्री येथे वास्तव्यास होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, वार्धक्यामुळे त्यांची प्रकृती उपचारांना पुरेसा प्रतिसाद देत नव्हती. अखेर त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

**-संजीव वेलणकर**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : गेल्या अनेक वर्षांच्या तुलनेत तापमान कमालीचे वाढले आहे. दुपारी १२ ते ४ पर्यंत शक्यतो बाहेर न पडण्याचे संकेत मिळत आहेत. पारा चाळीशी पार करण्याचा अंदाज दिला जात आहे. अशा स्थितीत ठिकठिकाणच्या स्टॉलवर थंड पेयासाठी गर्दी वाढत आहे. (छाया: लक्ष्मण ठाकूर )**

## आरोग्य प्रहर

### उन्हाळ्यात 'या' पदार्थांचे सेवन करा

देशासह राज्यात उष्णतेच्या लाटेने हाहाकार माजला आहे. विशेषतः तापमान गगनाला भिडले आहे. लोक घराच्या बाहेर जायला घाबरतात. उष्ण तापमानात तुमच्या शरीर सिस्टमला फायदेशीर असलेले अन्न खाणे अतिशय महत्त्वाचे आहे. चुकीचे अन्नाचे सेवन शरीराला धोकादायक असू शकते. या मुळे नैसर्गिकरित्या हायड्रेटिंग पेये आणि सोयीस्कर अन्न आपण सेवन केले पाहिजे. उन्हाळ्यातील सात खाद्यपदार्थ आणि पेयांबद्दल आपण आज चर्चा करणार आहोत. उन्हाळ्यात फ्रिजच्या बाहेर जास्त वेळ अन्न ठेवल्यास ते शिळे होते. अति उष्णतेमुळे ते पदार्थ खराब होतात, विशेषतः तेलकट, आंबट आणि गरम पदार्थ शरिराला घातक असतात. त्यामुळे उन्हाळ्यात आपण असे पदार्थ खाणे टाळले पाहिजे की शरीराला नैसर्गिकरीत्या थंड करणारे पदार्थ जसे की नारळपाणी, ताक, टरबूज इ. उष्णतेवर मात करण्यासाठी काही उत्तम पर्याय आहे. यामध्ये नारळ हे शरिरासाठी सर्वोत्तम आहे. आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणे नारळ पाणीची पचनपूर्व आणि नंतरची चव फायदेशीर आणि चवीला गोड असते. नारळाच्या पाण्याचा शरीरावर थंड प्रभाव पडतो आणि या भयंकर उन्हाळ्यात लोकांनी दररोज किमान एक नारळ खावा. ज्यांची पचनशक्ती खराब आहे त्यांनीही कमी प्रमाणात नारळाचे सेवन करावे. टरबूजमध्ये ९० टक्केपेक्षा जास्त पाणी असते, ज्यामुळे एक अतिशय हायड्रेटिंग पदार्थ आहे. उन्हाळ्यातील एक लोकप्रिय फळ म्हणून टरबूजची ख्याती आहे. तुम्ही दिवसातून दोनदा त्याचा आनंद घेऊ शकता. टरबूज थंड असल्याने त्याचा शरिरावर उत्तम प्रभाव असतो. तुम्ही टरबूजला रसाच्या रूपात देखील घेऊ शकता. टरबूज यकृत आणि किडनीचे कार्य देखील व्यवस्थित ठेवण्यास मदत करते. काकडीला आयुर्वेदात 'सुशीतला' म्हणतात, याचा अर्थ नैसर्गिकरित्या थंड असणे. जास्त तहान लागण्याशी संबंधित समस्या असलेल्या रुग्णांना काकडी अनेकदा उपयोगी पडते. काकडीत पाण्याचे प्रमाणही भरपूर असते जे उष्णतेवर मात करु शकते आणि तुमचे शरीर थंड ठेवते. मूगडाळ देखील अतिशय आरोग्यदायी आणि पौष्टिक मानली जाते. विशेषतः उन्हाळ्यात मूगडाळ ही शरिरासाठी अधिक पोषक आहे. मूग डाळ शरीरातील पित्त दोष संतुलित करण्यास मदत करते. ही अगदी सहज पचण्याजोगी आहे आणि जवळजवळ दररोज सेवन केली जाऊ शकते. ताक तर भारतात शेकडो वर्षांपासून कूलिंग रिफ्रेशमेंट म्हणून सेवन केले जाते. ताकात आपली पचन सुधारण्याची भरपूर क्षमता आहे.



# अंबा नदीचे पाणी झाले चिखलयुक्त

## ▌पालीतील नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली शहराला येथील अंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. गुरुवारी (दि. ५) उन्हेरे येथील धरणातील चिखलयुक्त पाणी सोडल्याने अंबा नदीचे पाणी प्रचंड गढूळ झाले होते. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.नळाद्वारे अचानक गढूळ पाणी आल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली.

शहरातील सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते थेट अंबा नदीपात्रात सोडले जाते. आजूबाजूच्या कारखान्यांतील प्रदूषित पाणीदेखील नदीमध्ये सोडण्यात येते. पाली शहराला अंबा नदीतून पाणीपुरवठा केला जातो. शहरातील नळाच्या पाण्यातून शेवाळ व चिखल हे नेहमीच येत असते. परिणामी पालीतील नागरिक आणि भाविकांना नाईलाजाने गढूळ व प्रदूषित पाणी वापरावे लागत आहे. नियमित पाणीपट्टी भरूनदेखील प्रदूषित पाणी मिळत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.


(छाया : धम्मशील सावंत)

**उन्हेरे धरणातून चिखलयुक्त पाणी सोडल्याने अंबा नदीचे पाणी दूषित झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका आहे. गाळ साचल्याने नदीचे पात्र अरुंद होईल. पावसाळ्यात पुराचा धोका संभवतो. तसेच हा गाळ पाणी खेचणाऱ्या मोटार पंपात जाऊन पंप बंद पडू शकतात. त्यामुळे कृत्रिम पाणीटंचाईचे संकट येऊ शकते.**
**–अमित निंबाळकर, माजी सदस्य, पाली ग्रामपंचायत**

**पाटबंधारे विभागाने कोणतीही पूर्वसूचना न देता उन्हेरे धरणातील पाणी अंबा नदीमध्ये सोडले आहे. त्यामुळे नदीचे पाणी गढूळ झाले आहे. नगरपंचायतीद्वारे पाण्यात औषध टाकण्यात आले आहे. तसेच दोनतीन दिवसांत गाळ खाली बसेल. नागरिकांनी पाणी गाळून व उकळून प्यावे.**
**–सुलतान बेनसेकर, पाणीपुरवठा सभापती, पाली नगरपंचायत**

**उन्हेरे धरणाची जॅकवेल व तेथील दरवाजाच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. हा दरवाजा उघडल्याने धरणात साठलेला काही गाळ पाण्यामार्फत अंबा नदीला मिळाला आहे. एक दोन दिवसांत हा गाळ खाली बसेल व पाणी स्वच्छ होईल.**
**–राकेश धाकतोडे, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, कोलाड**


(छाया : महेंद्र खैरे)

# अलिबाग तालुक्यात हर घर जल योजनेंतर्गत पाणीपुरवठ्याची मागणी

### केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांना भाजपच्या जगदिश घरत यांचे निवेदन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात ठिकठिकाणी पाण्याची टंचाई असून केंद्र सरकारच्या हर घर जल योजनेंतर्गत पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी भाजप ओबीसी मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष जगदिश घरत यांनी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

केंद्रीय मंत्री कपिल पाटील नुकतेच अलिबाग तालुक्यात आले होते. त्या वेळी त्यांनी साळाव व येसदे येथे स्थानिकांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. या वेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांच्यासह जगदिश घरत यांनी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची भेट घेतली व त्यांना निवेदन दिले.

अलिबाग तालुक्यातील थळ चाळमला येथील कोळीबांधव पिण्याच्या पाण्यापासून वंचीत आहेत, तसेच किहीम, रेवस, बोंडणी या भागातसुध्दा पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. त्याबाबत संबधीतांकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागवून उपाययोजना कराव्यात. पाणीटंचाईची समस्या दूर करण्यासाठी 'हर घर जल' योजने अंतर्गत पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# जमिनीच्या पैशासाठी भाच्याने केला मामाचा खून

## गुन्हात मामीदेखील सामिल ▌दोन वर्षांनी फुटली हत्येला वाचा

**खोपोली : प्रतिनिधी**

जमिनीचा पैसा हडपण्यासाठी भाच्याने मामाचा थंड डोक्याने काटा काढला. मात्र खालापूर पोलिसांच्या कौशल्यपूर्ण तपासामुळे तब्बल दोन वर्षांनी या खुनाला वाचा फुटली. या प्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे.

खालापूर पोलिसांना १ जुलै २०२० रोजी जुन्या मुंबई–पुणे महामार्गावर चौकनजीक अंदाजे पन्नास वर्षे वयाचा इसम मृतावस्थेत सापडला होता. मृतदेहाची कोणतीही ओळख पटेल असा पुरावा नसल्याने पोलिसांनी बेवारस नोंद करत मृतदेहाच्या नातेवाईकांचा शोध सुरू केला होता. परंतु मृतदेहाचा ताबा घेण्यास कोणीही पुढे न आल्याने पोलिसाने नियमानुसार अंत्यसंस्कार केले होते. या घटनेला दोन वर्ष पूर्ण होत असतानाच अनपेक्षितरित्या प्रकरणाचा खुलासा झाला. चौक येथे जुलै २०२० मध्ये सापडलेला मृतदेह हा सावकार तात्याबा घुले (सावरगाव, पुणे) या व्यक्तीचा असून सावकार याची जमीन हडपण्यासाठी त्याचा भाचा गणेश देवराम दरेकर (नारायणगाव) आणि सावकारची दुसरी पत्नी पल्लवी विठ्ठल चिलवंत ( रा. कोपरखैराणे, नवी मुंबई, सध्या रा. कळवा, जि.ठाणे) यांनी त्याचा खून केल्याचे वास्तव समोर आले. त्याहून धक्कादायक म्हणजे सावकार तात्याबा घुले याचा खोटा मयत दाखला देखील २०२० मध्ये पल्लवी आणि गणेश यांनी तयार करून घेतला होता.

सावकार घुले हा पहिल्या पत्नीपासून विभक्त राहत होता. त्याचा भाचा गणेशाला मामाच्या नावे असलेल्या जमिनीची माहिती होती. ही जमीन विकून पैसा कमवायचा या हेतूने गणेशने प्लान तयार केला. यामध्ये त्याने पल्लवी हिलादेखील सामील करून घेतले. गणेशने सावकार याला कामानिमित्त कोपरखैरणे येथे आणले होते. त्याठिकाणी पल्लवी सोबत ओळख करून दिली होती. पुढे या ओळखीचे रूपांतर प्रेमात झाल्यानंतर गणेशने दोघांच लग्न लावून दिलं होतं. सावकार घुले याच्या

**गुन्हे — खालापूर मर्डर मिस्ट्री**

नावे असलेली जमीन विक्री करून त्यामधून आलेले पैसे हडप करण्यासाठी गणेश आणि पल्लवी याने सावकार याचा काटा काढण्याचे ठरवले. त्यानुसार १ जुलै २०२० रोजी रिक्षातून जेवणासाठी तिघेजण बाहेर गेले. त्यावेळी गणेश याने पाण्यातून मामा सावकार याला झोपेच्या गोळ्या दिल्या. त्यामुळे तो बेशुद्ध झाला रिक्षाने तिघेजण जुन्या मुंबई–पुणे महामार्गाने चौकनजीक आल्यानंतर पल्लवीने पती सावकारला रिक्षातून ढकलून दिले. त्यात सावकाराच्या डोक्याला मोठी दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला होता. गणेश आणि पल्लवीने राजपाल हॉस्पिटल नवी मुंबई येथील मृत्यूची खोटी कागदपत्रे तयार करून त्याच्या आधारे नवीमुंबई महानगरपालिका विभाग कोपरखैराणे येथील मृत्यूचा खोटा दाखला बनविला होता.

**अशी फुटली खुनाला वाचा**

सावकार घुले यांच्या नावे असलेली जमीन कैलास घुले यांना विक्री करण्यात आली होती. कैलास घुले यांनी वारस नोंद होण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्याची माहिती सावकार याचा भाऊ संपत तात्याबा घुले याला मिळाली. त्याने याबाबत अधिक चौकशी केली असता गणेश आणि पल्लवी याने सावकार याचा आजारपणात मृत्यू झाल्याचे सांगितले. परंतु सावकाराच्या भावाला संशय आल्याने त्याने पोलिसात तक्रार केली.

**खुनाचा प्रकार उघडकीस आल्यानंतर खालापूर पोलिसांनी पंचनाम्यात घेतलेले मयताचे फोटो आणि इतर वर्णन यावरून सावकारचा भाऊ संपत याला मृतदेहाची ओळख पटली आहे. सध्या गणेश आणि पल्लवी दोन्ही आरोपी पोलिसांच्या कोठडीत आहेत.**
**–अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, खालापूर**

तपासात नवी मुंबई महानगरपालिका विभाग कोपरखैराणे येथून सावकार घुले यांचा मृत्यूचा दाखला दिल्याची कोणतीही नोंद नसल्याचे समोर आल्याने संशय अधिक बळावत गेला. सावकार याचा मृत्यू दाखला खोटा असल्याचे समोर आले आणि गणेश, पल्लवीचे बिंग फुटले.

## पेण सावरसई येथे दोन दुचाकींची धडक; दोघे जखमी

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील सावरसई गावच्या हद्दीत गुरूवारी (दि. ५) एका भरधाव दुचाकीने दुसऱ्या दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोनजण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

रुपेश चंद्रकांत साळवी (रा. नाणेगाव, ता. पेण) यांचे वडील चंद्रकांत रामभाऊ साळवी (वय ५५) हे त्यांच्या ताब्यात असलेली होंडा कंपनीची ड्रीम युगा गाडी (एम एच–०६,बीके–१७६७) ने गुरूवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास नाणेगाव ते पेण असे येत असताना सावरसई गावच्या हद्दीत होंडा कंपनीची लाल रंगाची शाईन गाडी (एमएच–०६, बीआर–९३४४) ने विरूध्द दिशेने येवून चंद्रकांत साळवी यांच्या मोटारसायकलला ठोकर दिली. या अपघातात दोन्ही मोटारसायकलस्वार जखमी झाले.

या अपघाताची नोंद पेण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस नाईक कौशिक फेंगडू करीत आहेत.


मा. राव साहेब

**जाहीर नोटीस**

प्रो. जमा. ५०

अर्जदाराचे वकील
ॲड. समिर राम कुंभार
मो.नं. ९००४४०२३३०

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज नं. ७३५/२०२२
ने.ता. २०/०७/२०२२

**१) श्री. यशवंत चिंतामण महाजन**
वय ६७ वर्षे, धंदा–शेती
रा. १८, ए हरिभक्ती धाम, दिपाली नगर
नाशिक सिडको कॉलनी, जि नाशिक
**२) श्री. वसंत चिंतामण महाजन**
वय ६४ वर्षे, धंदा–शेती
रा. २०३/२ सीताई सोसायटी,
जाधव संकुल अशोक नगर, सातपुर
नाशिक, जि.नाशिक
**३) श्री. अरूण चिंतामण महाजन**
वय ५९ वर्षे, धंदा–शेती
रा. सी/१५, अजिंक्यतारा को. ऑप. हॉ. सो.,
काजुर पाडा, पाईप लाईन, कुर्ला (पश्चिम) मुंबई
**४) श्री. शशिकांत चिंतामण महाजन**
वय ५४ वर्षे, धंदा–शेती
रा. प्लॉट नं.१, सर्वे नं.११८/बी अंजना रोड,
निअर पगारिया चेंबर, जळगाव, जि. जळगाव
} **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही } **सामनेवाला**

ज्याअर्थी **कै. चिंतामण बुधा महाजन** हे दिनांक १८/१२/२०१९ रोजी अशोक नगर, सातपुर नाशिक, जि.नाशिक, येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांची पली **कै. कमल चिंतामण महाजन** या दिनांक १७/०५/२००६ रोजी मौजे पालेखुर्द, पो. देविचापाडा ता. पनवेल, जि.रायगड येथे मृत्यु पावल्या आहेत. तसेच त्यांची आई **कै. मधुराबाई बुधा महाजन** या मौजे भिकमचंन, जैन नगर, जळगाव, जि. जळगाव येथे बऱ्याच वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. **कै. चिंतामण बुधा महाजन** यांचे नावे खालील वर्णनाच्या मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे पालेखुर्द, ता. पनवेल, जि. रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील घर नं. ७२ कच्चे घर (जोता) क्षेत्रफळ १००० चौ. फुट, ही मिळकत.

**कै. चिंतामण बुधा महाजन** तसेच त्यांची पत्नी **कै. कमल चिंतामण महाजन** तसेच त्यांची आई कै. मधुराबाई बुधा महाजन यांस अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. सबब अर्जदार सदरचा अर्ज करीत आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाही असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

तारीख ६/५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यांनिशी दिली.

ठिकाण – पनवेल
दिनांक – ६/५/२०२२ हुकूमावरुन

**सही/–** **क. लिपिक** दि. न्या. व. स्तर पनवेल (शिक्का) **सही/–** **सहा. अधिक्षक** दि. न्या. व. स्तर पनवेल


# कोंडवीत लग्नाच्या वरातीवरून दोन गटांत मारहाण

## परस्परविरोधी तक्रार दाखल

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ पोलीस ठाणे हद्दीतील कोंडवी पाबळ येथे लग्नाच्या वरातीवर हल्ला करण्यात आला. यामध्ये दोन महिला जखमी झाल्या आहेत. यावेळी जाब विचारण्यास गेलेल्या साक्षीदारांनाही मारहाण करण्यात आली.

महिला फिर्यादी अलका अनंत कदम (रा. कोंडवी ता. पेण) यांच्या मुलाची बुधवारी (दि. ४) रात्री १०.३० वाजता लग्नाची वरात गावातील नरेश शिंदे यांच्या घरासमोरून जात असताना आरोपी ज्ञानेश्वर कदम याने त्याच्या घराच्या गॅलरीतून काचेच्या रिकाम्या बाटल्या फेकुन मारल्यामुळे वरातीतील दोन महिला जखमी झाल्या. तेंव्हा साक्षीदार अलका कदम या जाब विचारण्यास गेल्या असता त्यांच्या अंगावर मसाला फेकला. त्या वेळी अलका कदम यांना वाचविण्यासाठी गेलेल्या केतन कदम यांना जगन्नाथ शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे यांनी हाताबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळी व दमदाटी केली. हरिभाऊ शिंदे याने लाकडी दांडक्याने अलका कदम यांना मारहाण केली. त्यात त्यांच्या उजव्या हाताच्या पंजाला दूखापत झाली.

याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार म्हात्रे हे करीत आहेत.

दुसरे फिर्यादी नरेश हरिभाऊ शिंदे (रा.कोंडवी, ता. पेण) यांच्या घरासमोरून बुधवारी रात्री आरोपी केतन कदम (रा. कोंडवी, ता. पेण) याच्या भावाची वरात जात असताना आरोपी केतन कदम याने फटाके वाजविले. त्याच्या आवाजाने फिर्यादी यांची लहान मुलगी रडू लागली. तेव्हा साक्षीदार यांनी आरोपी येथे फटाके लावू नका, असे सांगितले. या गोष्टीचा राग येवुन आरोपी केतन कदम याने साक्षीदार नरेश शिंदे यांना दमदाटी केली. त्यानंतर आरोपी केतन कदम, रामभाऊ कदम व इतर पाच जणांनी घरावर दगडफेक केली व काही जणांनी दरवाज्यावर लाथा मारुन दरवाजा तोडुन नुकसान केले व घरात शिरून हाताबुक्क्याने मारहाण करून शिविगाळी व दमदाटी केली. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार राजेंद म्हात्रे करीत आहेत.

## मुरुडमध्ये मूर्तींचा दिंडी सोहळा

**मुरुड : प्रतिनिधी**

ज्ञानोबा माऊली तुकाराम, असा जयघोष करीत टाळ मृदंगाच्या तालावर अभंग म्हणत शुक्रवारी (दि. ६) सकाळी मुरूडमधील श्री बापूजी देव मंदिर कुंभारवाडा ते श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिर जुनी पेठ येथे विठ्ठल, रुक्मिणी यांच्या मुर्ती नेण्यात आल्या. यावेळी दिंडी मार्गावरील प्रत्येक घरासमोर रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.



श्री भैरव विठ्ठल रुक्मिणी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विश्वास चव्हाण, उपाध्यक्ष संदिप राजपुरकर, सचिव संजय नाईक, सहसचिव दिपक राजपुरकर, खजिनदार प्रकाश चव्हाण, सहखजिनदार गजानन भोईर, सदस्य सुधीर अत्रे, दिलीप जामकर, अविनाश कोतवाल, हभप दिनेश महाराज गोसावी, संतोष लखमदे, हभप अंकेश पाटील, सिध्देश करंबे माजी अध्यक्ष गिरीश साळी, मोहन करंदेकर, विकास भाटकर, नितिन राजपुरकर, अविनाश साळी, मंगेश डोंगरीकर, नितिन डोंगरीकर, राजेश गुप्ते, वृषाली चव्हाण, श्रीकांत मिठागरी, संदिप पोतदार, ओमकार चोडणेकर, ओमकार पोतदार, नितिन आबुर्ले, प्रशांत आबुंर्ले, महेंद्र आबुर्ले, भाई पोतदार, रूपेश भाटकर, अच्युत पोतदार, अच्युत चव्हाण, उमेश भोईर, अनिल पोवळे, बंड्या चाचड, उदय भाटकर, प्रभात नाईक, जयेश चोडणेकर आदिंसह सत्यम युवक, शिवशक्ती क्रीडा मंडळ व जरीमरी गावदेवी महिला मंडळचे पदाधिकारी व भाविक या दिंडी सोहळ्यात सहभागी झाले होते.

## म्हसळ्यात राजर्षि शाहू महाराजांना अभिवादन



(छाया : संजय खांबेटे)

**म्हसळा : प्रतिनिधी**

राजश्री शाहू महाराजांच्या स्मृतीशताब्दी वर्षानिमित्ताने शुक्रवारी (दि. ६) म्हसळा सार्वजनिक वाचनालयात राजर्षि शाहू महाराजांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. या वेळी शाहू महाराजांच्या प्रतिमेसमोर उपस्थितांनी शंभर सेकंद स्तब्ध उभे राहून त्यांना मानवंदना दिली. वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, म्हसळा तालुका गटशिक्षण आधिकारी मंगेश साळी, कृषी आधिकारी एस. डी. शिंदे, पी. एम. गायकवाड, डी. पी. सरनाईक, वैभव गुजर, उदय करडे, डी. व्ही. पालवे, सायली चोगले, दिपाली दातार, वाचक उपस्थित होते.


**Change of Name**

I the under signed **Mr. Ajaykumar Prabhubhai Bhakt** (Old Name) residing at Flat No. 101, New Sai Krupa CHS, Plot No. 201/2B, Ambedkar Road, Old Panvel, Dist. Raigad 410206, Maharashtra State.

I Changed Name by the Affidavit No. 6429/2022 dated 6/05/2022 so that I rimitter issue may here after be called new Name **Mr. Ajay Prabhubhai Bhakta.**

Sign by New Name
Mr. Ajay Prabhubhai Bhakta

## निवडक

### कळंबोलीत २३ टन सिमेंटचा अपहार

**पनवेल :** कळंबोली परिसरात एक लाख ८८ हजार १७० रुपये किंमतीच्या २३ टन सिमेंटचा अपहार केल्याची घटना घडली आहे. उरज सिमेंट कॅरिअर या ट्रान्सपोर्ट कंपनीच्या चालकाने ट्रकमध्ये एक लाख ८८ हजार १७० रुपये किंमतीचे २३ टन खुले सिमेंट भरले होते. सिमेंट गोरेगाव येथे पोहचविणे अपेक्षित होते, परंतु त्याने सिमेंटचा परस्पर अपहार करून ट्रक एसीसी कंपनीच्या समोर उभा करून पळून गेला आहे. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर त्याच्याविरोधात कळंबोली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे.

### जावळेतील तलावात आढळला मृतदेह

**पनवेल :** तालुक्यातील जावळे गावात असलेल्या तलावात एका मुलाचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. जावळे गावात असलेल्या तलावात सात ते आठ वयोगटातील एका मुलाचा मृतदेह आढळला. या मुलाची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी आजूबाजूच्या परिसरात चौकशी केली, मात्र त्याची ओळख पटलेली नाही. त्यामुळे पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

### जाब विचारल्याने महिलेला मारहाण

**पनवेल :** माझ्या मुलीस शिवीगाळ का करतोस? अशी विचारणा करण्यास गेलेल्या आईला मारहाण केल्याची घटना तालुक्यातील अजिवली कातकरीवाडी येथे घडली. मीरा मनोहर यादव (वय ४२) यांच्या मुलीस आरोपी बाळू दत्या याने शिवीगाळ केल्याने याबाबत विचारणा करण्यासाठी मीरा यादव या गेल्या असता आरोपीने त्यांना लाकडी काठीने मारून त्यांना गंभीर दुखापत केली तसेच शिवीगाळ केल्याने याबाबत गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

### पोपटराव देशमुख यांना कृतज्ञता पुरस्कार

**नवी मुंबई :** माथाडी कामगार युनियनचे संयुक्त सरचिटणीस व जनसंपर्क अधिकारी पोपटराव रामचंद्र देशमुख यांना काकासाहेब चव्हाण कॉलेज माजी विद्यार्थी मंडळातर्फे कामगार क्षेत्रातून शिक्षण महर्षी परमपूज्य डॉ. बापूजी साळुखे कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात आला. काकासाहेब चव्हाण कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि माथाडी कामगारांचे आराध्यदैवत स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे पोपटराव देशमुख हे संयुक्त सरचिटणीस व जनसंपर्क अधिकारी आहेत. १ मे रोजी तळमावले या ठिकाणी काकासाहेब चव्हाण कॉलेजच्या माजी विद्यार्थी मेळाव्यात शिक्षण महर्षी परमपूज्य डॉ. बापूजी साळुखे कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात आला. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. यू. शेठ तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुखे आदी उपस्थित होते.



# तांत्रिक बिघाडामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित

## वाशी, कोपरखैरणे परिसरात जनित्र जळाल्याने अडचण; पनवेलकरही हैराण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी, कोपरखैरणे परिसरात जनित्र जळाल्याने गुरुवारी (दि. ५) सकाळपासून वीजपुरवठा खंडित झाला होता तर पनवेल व नेरुळ परिसरात महापारेषणच्या मुख्य वीजवाहिनीत बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. दुपारपर्यंत हळूहळू वीजपुरवठा पूर्ववत झाला. वीज नसल्याने लघुउद्योजकांनाही फटका बसला. आधीच उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांचे मात्र मोठे हाल झाले.



(प्रातिनिधिक छायाचित्र)

वाशी येथील वीजपुरवठा केंद्रातील जनित्रात तांत्रिक बिघाड झाल्याने वाशी व कोपरखैरणे परिसरात वीजपुरवठा खंडित झाला होता. पाच तासांच्या दुरुस्ती कामानंतर वीजपुरवठा सुरळीत झाला, तर महापारेषणच्या तळेगाव ते नेरुळ या मुख्य वीजवाहिनीत बिघाड झाल्याने नेरुळसह पनवेल परिसरात वीजपुरवठा खंडित झाला होता. तापमान वाढीमुळे सध्या विजेची मागणी वाढली आहे. त्यात गेले काही दिवस नवी मुंबई, पनवेल व उरण परिसरात वीजपुरवठा अधून-मधून खंडित होत आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. त्यात गुरुवारी वीजपुरवठ्यातील तांत्रिक बिघाडामुळे बहुतांश ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे दुपारपर्यंत विजेविना राहावे लागल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला.


वाशी सेक्टर २९ येथील विद्युत जनित्र सकाळी तांत्रिक बिघाड झाल्याने जळाले. त्यामुळे महावितरणने तातडीने दखल घेत या केंद्रावरून होत असलेल्या भागाचा वीजपुरवठा खंडित केला. दोन तासांत दुरुस्ती करीत जनित्र बसवण्यात आले मात्र यात महावितरणने पावसाळापूर्व देखभाल दुरुस्तीची कामेही करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे वाशी सेक्टर २६, २८, २९ व १५चा काही भाग तसेच

> **महापारेषणच्या वीजवाहिनीत बिघाड झाल्याने पनवेल परिसरात तातडीचे भारनियमन करण्यात आले मात्र एकाच वेळी वीजपुरवठा खंडित न करता नोडनुसार एक-एक तासाचे भारनियमन करण्यात आले.**
>
> **-सतीश सरोदे, कार्यकारी अभियंता, महावितरण**

वाशी स्टेशन परिसरातील सेक्टर १६ व १७ यांसह कोपरखैरणे विभागातील बोनकोडे, खैरणेगाव, सेक्टर १ ते ११ या परिसरात सकाळपासून वीजपुरवठा खंडित झाला होता. सुमारे पाच तासांनंतर वीजपुरवठा पूर्ववत झाला.

तळेगाव ते खारघर अशी महापारेषणची ४०० मेगावॅटची मुख्य वीजवाहिनी असून त्यात तांत्रिक बिघाड (ब्रेकडाऊन) झाल्याने पनवेल परिसरातीत काही ठिकाणी सकाळी ११ ते १२ तर काही ठिकाणी दुपारी दोन ते तीन दरम्यान वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. कामोठे येथील ३३ मेगावॅटच्या वीजवाहिनीतही बिघाड झाल्याने कामोठे खारघर, नेरुळ, बेलापूर येथील वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता.

२८ एप्रिल रोजीही पडघा येथील विद्युत पारेषण केंद्रामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने दीड ते तीन तास वीजपुरवठा खंडित झाला होता. कधी तांत्रिक बिघाड तर कधी देखभाल दुरुस्ती कारणास्तव वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने वीजग्राहक त्रस्त आहेत.



# अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

अनधिकृत रेती उत्खनन करणाऱ्या माफियांवर शुक्रवारी (दि. ६) पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या निर्देशांनुसार पथकाने कारवाई करून चार बोटींसह इतर सामान जप्त केले आहे.




पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत रेती उत्खनन सुरू असून, याची गंभीर दखल घेत पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या निर्देशांनुसार शुक्रवारी रोडपाली खाडीत धाड टाकून, रेती उत्खनन करून वाहून नेणाऱ्या दोन बार्ज आणि दोन बोटी तसेच सक्शन पंप जप्त केले. त्यात काही रेती ही जप्त करण्यात आली आहे. आतापर्यंत पनवेल तहसील कार्य क्षेत्रात दहा कारवाया करण्यात आल्या असून नऊ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्हा दाखल करून पुढेही कारवाई अशीच सुरू राहणार असल्याचे कारवाई प्रमुख नायब तहसीलदार मांडे यांनी सांगितले.

# अज्ञात चौकडीने ट्रेलर व टेम्पोचालकाला लुटले

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात चौकडीने ट्रेलरसह टेम्पोचालकाला लाखो रुपयांना लुटल्याची घटना पनवेल परिसरात घडल्याने वाहन चालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

दऱ्याप्पा घुंबरे (वय २७) हे त्यांच्या ताब्यातील ट्रेलर पुणे-मुंबई एक्स्प्रेस वे रोडच्या पनवेल एक्झिटजवळ मुंबई लेनच्या कडेला थांबले होते. त्यावेळी चार अज्ञातांनी तेथे येऊन त्यांना मारहाण करून त्यांच्याकडील रोख रक्कम व मोबाईल फोन असा एकूण ५३ हजार ३०० रुपये किंमतीचा ऐवज लुटला.

दुसऱ्या घटनेत नागराज मराठ (वय ३३) हा त्याच्या ताब्यातील टेम्पो घेऊन मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे ने पुणे लेनने घेऊन जाऊन पळस्पे टॅप पोलीस चौकीजवळ आल्यावर रस्त्याच्या बाजूला गेले असता त्यांनाही अज्ञात चार जणांनी तेथे येऊन त्यांना धमकावून त्यांच्याकडील ६६ हजार ४०० रुपये काढून घेऊन ते पळून गेले. याबाबतची तक्रारी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत.



**मुंबई : कामगार नेते महेंद्र घरत व त्यांची पत्नी शुभांगी घरत यांना लग्नाच्या वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर कुटुंबीयांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

# उन्हाळी सुटीमुळे मुलांच्या लसीकरणाचा वेग मंदावला

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

उन्हाळी सुटीपूर्वी १२ ते १४ वयोगटातील मुलांना किमान पहिली लसमात्रा १०० टक्के देण्याचे नियोजन नवी मुंबई महापालिकेने केले होते मात्र वाढलेला उन्हाचा पारा व सुट्टी यामुळे या लसीकरणाचा वेग मंदावला आहे.

दरम्यान सुट्टीकाळातही शहरात मुलांची लसीकरण सुरू ठेवण्यात येणार आहे. नवी मुंबई महापालिकेने १८ वर्षांवरील लसीकरणाचे पहिल्या व दुसऱ्या मात्राचे १०० टक्के उद्दिष्ट गाठले आहे. १२ ते १४ वयोगटातील लसीकरणासाठी लोकसंख्येच्या ३.१५ टक्के म्हणजेच ४७,४५९ एवढे लाभार्थी आहेत.

यातील ३८,४९० मुलांना पहिली तर २५,०२१ जणांना दुसरी लसमात्रा देण्यात आली आहे.



नवी मुंबईत १२ ते १४ वयोगटातील मुलांच्या लसीकरणाचा वेग सुरुवातीपासून चांगला होता. पालिकेने शहरातील नेरुळ, ऐरोली, वाशी, तुर्भे तसेच कामगार विमा रुग्णालय येथील जम्बो सेंटरबरोबरच शहरातील २११ शाळांमध्ये १२ ते १४ वयोगटातील लसीकरणाचे पालिकेने नियोजन केले होते.

या वयोगटातील लसीकरणासाठी पालिकेला अद्याप ९७ हजार कोर्बेवॅक्स लस प्राप्त झाल्या आहेत मात्र आता शाळांना लागलेली उन्हाळी सुट्टी तर दुसरीकडे उन्हाचा चटका याचा परिणाम लसीकरणावर होत आहे.

> **नवी मुंबईत सर्वच वयोगटातील लसीकरणाची टक्केवारी चांगली असून मुलांच्या लसीकरणात शाळांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. अजूनही शाळा चांगली मदत करीत आहेत परंतु एकीकडे मुलांना लागलेली उन्हाळ्याची सुट्टी व दुसरीकडे शहरात असलेला उन्हाचा चटका याचा परिणाम लसीकरण कमी होत असल्याचे दिसून येत आहे.**
>
> **-डॉ. रत्नप्रभा चव्हाण, लसीकरण प्रमुख**

उन्हाळी सुट्ट्यांमुळे अनेक विद्यार्थी बाहेरगावी फिरायला गेल्यामुळे या वयोगटातील मुलांचे लसीकरण कमी होत असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली. शाळा सुरू होत्या, तोपर्यंत शाळेत सत्र आयोजित करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण करून घेण्याचे प्रयत्न आरोग्य विभागाने केले होते, असे ठाणे जिल्हा लसीकरण अधिकारी डॉ. अंजली चौधरी यांनी सांगितले.

# सीकेटी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागात माणुसकीची भिंत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


कोरोना महामारीच्या काळात माणसातल्या माणुसकीची नव्याने ओळख झाली. हिच मानवी मुल्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी रुजविण्याकरिता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर (स्वायत्त)च्या राष्ट्रीय कॅडेट कॉप्स (एनसीसी) विभागाच्या वतीने सोमवारी (दि. २) महाविद्यालयाच्या विभागात माणुसकीची भिंत हा उपक्रम राबविला. या उपक्रमाचे युनियन हेड ऑफिस, रायगड युएनआयओचे निवृत्त कर्मचारी रमाकांत भगत, रोटरी क्लब ऑफ खांदा कॉलनीचे सदस्य विश्राम एकंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले.



या वेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना एनसीसी विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. यु. टी. भंडारे यांनी या उपक्रमाचे महत्त्व विषद केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रमाकांत भगत यांनी संत तुकारामांच्या ओळी सांगत जी माणसे गोरगरिबांना आपलिसी करतात त्यांना देव समजण्याबाबत भाष्य केले. खांदा कॉलनी रोटरी क्लबचे सदस्य विश्राम एकंबे यांनी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाचे कौतुक करीत प्रो. डॉ. यु. टी. भंडारे यांच्यामार्फत माणुसकी जपणाऱ्या बहुविध उपक्रमांचा मागोवा घेत त्यांच्या मार्फत होणारे गरजू व्यक्तीसाठी अन्नवाटप अथवा इतर जीवनावश्यक वस्तूंचे वितरण आदींचा उल्लेख केला.

एनसीसी विभागाच्या सीटीओ प्रा. नीलिमा तिदार यांनी माणुसकीविषयी सांगताना माणुसकी म्हणजे केवळ दानधर्म नसून तो प्रत्येकाच्या आचार आणि विचारात आला पाहिजे, कोणत्याही व्यक्तीने कोणालाही कमी लेखता कामा नये असे म्हंटले. उपक्रमात प्राथमिक योगदान म्हणून एनसीसी विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. यु. टी. भंडारे यांनी कपडे ठेवले व त्याठिकाणी कोणीही जीवनावश्यक वस्तू माणुसकीच्या नात्याने ठेवू शकेल असे जाहीर केले. आभार एनसीसी कॅडेट अमित मिश्राने मानले.

उपक्रमाच्या यशस्वी प्रारंभासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. यु. टी. भंडारे आणि सीटीओ प्रा. नीलिमा तिदार यांनी विशेष परिश्रम घेतले. माणुसकीची भिंतीसारख्या नावीन्यपूर्ण आणि समाजोपयोगी उपक्रमाच्या सुरवातीसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी एनसीसी विभागाचे कौतुक केले.



# पनवेल स्टेशन मार्गावरील खड्डे भरले

## नगरसेवक राजू सोनी यांचा पाठपुरावा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानक परिसरातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. याबाबतची तक्रार स्थानिकांनी सभागृह नेते परेश ठाकूर व नगरसेवक राजू सोनी यांच्याकडे करताच त्यांनी पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून खड्डे बुजवून घेतले आहेत. त्यामुळे येथील रिक्षाचालकांनी व नागरिकांनी आभार मानले आहेत.

पनवेल स्टेशन परिसरातील रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे पादचारी तसेच वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या त्रासाला कंटाळून अखेर काही रिक्षाचालकांनी सभागृह नेते परेश ठाकूर व नगरसेवक राजू सोनी यांना सांगितले. त्यांनी या रस्त्याची पाहणी करून त्यांचे स्वीय सहाय्यक तुषार कापरे व मंदार देसाई यांना सांगून लवकरात लवकर हे काम पूर्ण करून घेण्यास सांगितले. त्यांनी लगेच महानगरपालिकेचे अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून हे काम पूर्ण करून घेतले. त्यामुळे येथील रिक्षाचालकांनी व नागरिकांनी सभागृह नेते परेश ठाकूर व नगरसेवक राजू सोनी यांचे आभार मानले आहेत.

# वीर वाजेकर कॉलेजमध्ये राजर्षि शाहू महाराजांना अभिवादन

**उरण : वार्ताहर**

फुंडे येथील वीर वाजेकर कॉलेजमध्ये राजर्षि शाहू महाराज स्मृतीदिन शताब्दीनिमित्त शुक्रवारी (दि. ६) महाविद्यालयात शाहू महाराजांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी शाहू महाराजांचे कार्य या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. खऱ्या अर्थाने कल्याणकारी राजा म्हणून शाहू महाराजांचा उल्लेख करावा लागतो. स्त्री शिक्षण, समानता, शेती, उद्योग, तंत्रज्ञान यावर भविष्याचा वेध घेऊन शाहू महाराजांनी काम केले. आरक्षण हा घटक त्यांनी प्रथम आपल्या संस्थानात सुरू केले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. उत्तमराव घोरपडे उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुजाता पाटील यांनी केले. आभार व सूत्रसंचालन प्रा. सी. डी. धिंदळे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, इतर सेवक उपस्थित होते.

# महाडची पूर समस्या, वीर-रानवडी रेल्वे दुपदरीकरणाचा प्रश्न सोडवणार

## केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांना आश्वासन

**महाड : प्रतिनिधी**

कोकण रेल्वेमार्गावरील वीर ते रानवडी दरम्यानच्या रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण तसेच दासगाव येथे पूर निवारण यंत्रणा उभारण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन लवकरात लवकर हे प्रश्न सोडविण्यात येतील, असे आश्वासन केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवूण दरेकर यांना गुरुवारी (दि. ५) दिले.


(छाया : महेश शिंदे)

कोकण रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण तसेच महाड येथील पूर निवारणाच्या प्रश्नासंदर्भात विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांनी गुरुवारी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची भेट घेतली. या वेळी चर्चा करताना दरेकर यांनी सांगितले की, दासगाव येथे रेल्वेने ६० मी. चा भराव टाकला आहे, त्यामुळे पावसाळ्यामध्ये नदीला पूर आला तर ते पाणी सुमारे ७२ तास तिथेच टिकून राहते. जेव्हा ओहोटी येते तेव्हाही पाणी ओसरण्यासाठी मार्ग नाही. ते पाणी ओसरले गेल्यास पूराची तीव्रता कमी होऊ शकते व पूर निवारणाचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. या वेळी दरेकर यांनी तेथील जागेचा आराखडा रेल्वे राज्यमंत्री दानवे यांना दाखविला. ना. दानवे यांनी हा विषय समजून घेतला व संबंधित अधिकऱ्यांना सूचना देऊन बैठक घेण्यास सांगितले.

कोकण रेल्वे मार्गावरील रत्नागिरीमधील रानवडी ते सांवतवाडी दरम्यान दुहेरी रेल्वे मार्ग आहे. तर रायगडमधील वीर व रत्नागिरीमधील रानवडी दरम्यान एकेरी रेल्वे मार्ग आहे. त्यामुळे मुंबईतून सुटणाऱ्या रेल्वे गाड्या रानवडी येथे थांबतात तर सांवतवाडी–गोव्याहून येणाऱ्या गाड्याही रानवडी येथे एकाच मार्गावर थांबतात. यामुळे येथे मोठ्या प्रमाणात रेल्वे वाहतूकीची समस्या निर्माण झाली आहे. वीर ते रानवडी दरम्यान रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण झाल्यास येथील वाहतूक सुरळीत होईल. असे दरेकर यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री दानवे यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना सदर जागेची पाहणी करुन त्यासंदर्भातील अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या व हा प्रश्न लवकर सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दरेकर यांना दिले.

महाड पूर निवारण समितीच्या शिष्टमंडळाने या वेळी रेल्वे राज्यमंत्री दानवे यांना निवेदन सादर केले. महाड पूर निवारण समितीचे नितीन पावले, डॉ. समीर बुटाला, संजीव मेहता, रवींद्र वेरणेकर, रायगड भाजपचे बिपीन म्हामुणकर, श्रीमती कुद्रीमोती, संदीप ठोंबरे आदी या वेळी उपस्थित होते.

# कर्जतमधील तबेला जळीत घटनेत एका म्हशीचा मृत्यू; आरोपी मोकाट


**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील जिते गावातील म्हशींचा तबेला २० एप्रिल २०२२ रोजी रात्रीच्या अंधारात जाळण्यात आला होता. त्याबद्दल आरोप असलेल्या व्यक्तींना नेरळ पोलिसांनी अद्याप अटक केली नाही. दरम्यान, त्या आगीमध्ये होरपळलेल्या एका म्हशींचा मृत्यू झाला असून शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

कर्जत तालुक्यातील जिते गावातील शेतकरी धनाजी घरत, त्यांचे वडील सदानंद घरत आणि भाऊ सतिष घरत हे शेती आणि दुग्ध व्यवसाय करतात. जिते गावच्या हद्दीत गावठाण जागेत जनावरचा गोठा असून त्यात ३५ म्हैशी आणि पेंढा व कड़बा ठेवण्यात आला होता. या गोठ्याला २० एप्रिल २०२२ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास आग लागली. त्यात भाताचा पेंढा आणि कडबा जळून सुमारे एक लाख ४०हजार ४४० रुपयांचे नुकसान झाले होते. तसेच गोठ्यातील तीन म्हैशीं होरपळल्या होत्या. त्यांच्यावर वाकस येथील पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. बागुल यांनी जिते येथे जाऊन उपचार केले होते. मात्र त्यातील एक म्हैस गुरुवारी (दि. ५) मृत झाली असून त्याचा पोलिसांनी पंचनामा केला आहे. त्यात ६५ हजाराचे नुकसान झाले आहे.

या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीनुसार तीन जणांवर गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी अद्याप कोणालाही अटक केलेली नाही. गोठा, जनावरे आणि पशूखाद्य यांचे नुकसान करणाऱ्यांवर पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.





(छाया : संतोष पेरणे)

# कर्जतच्या पुनर्वसन केंद्राला आर्थिक, धान्याची मदत

## ■ खोपोलीतील केएमसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची सामाजिक बांधिलकी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केएमसी महाविद्यालयाचे प्रथम व द्वितीय वर्ष शास्त्र फाउंडेशन कोर्स विषयाच्या विद्यार्थ्यांनी कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन केंद्राला स्वेच्छेने आर्थिक तसेच धान्य आणि अन्य आवश्यक वस्तूंची मोठी मदत केली आहे. ही मदत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांच्या हस्ते केंद्राचे समन्वयक श्री. ध्रुव, कु. लक्ष्मी, श्री प्रशांत यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.


(छाया : विनायक माळी)

कर्जत येथील श्रद्धा पुनर्वसन केंद्र ही संस्था मनोरुग्णांच्या पुनर्वसनासाठी खूप मोठे सामाजिक कार्य करीत आहे. खोपोलीतील केएमसी महाविद्यायालच्या फाउंडेशन कोर्स विषयाचे प्रा. मुकेश रूपवते यांच्या प्रयत्नाने २००८ सालापासून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून श्रद्धा पुनर्वसन केंद्राला मदत केली जात आहे. कोरोनाच्या काळातही या केंद्राला महाविद्यालयाने मदत केली होती. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पदवी शिक्षण घेतानाच सामाजिक जाण, समाजाप्रती आत्मीयता व विश्वबंधुत्वाची जाणीव रुजावी या हेतूने हा उपक्रम राबवत असल्याचे प्रा. मुकेश रुपवते यांनी या विशेष कार्यक्रमात सांगितले.

केंद्राचे समन्वयक श्री. ध्रुव यांनी श्रद्धा पुनर्वसन केंद्राच्या सर्व उपक्रमांबद्दल सविस्तर माहिती दिली. स्व–विकासाबरोबरच विद्यार्थ्यांनी समाज विकासामध्ये आपली भूमिका योग्य पद्धतीने बजावली पाहिजे, असे मत प्राचार्य डॉ. प्रताप पाटील यांनी या वेळी व्यक्त केले.

संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष संजय पाटील, कार्यवाह किशोर पाटील, महाविद्यालयाचे उपाध्यक्ष राजेश अभाणी, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. अशोक कंधारे, इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. जी. पी. मुळीक, मराठी विभागाचे डॉ. भाऊसाहेब नन्नवरे, एनसीसीच्या एएनओ प्रा. शीतल गायकवाड यांच्यासह विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी तरुणाईने पुढे यावे -सूर्यकांत पाटील

## वडखळ येथे आगरी सामाजिक संस्थेची वार्षिक सभा उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

आगरी समाजाचे अस्तित्व जपणाऱ्या संस्थेची ताकद मजबूत करण्यासाठी आणि ही चळवळ सर्वदूर पोहोचविण्यासाठी तरुणाईने संस्थेच्या कार्यात उतरणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत पाटील यांनी येथे केले.


(छाया : अनिस मनियार)

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच वडखळ येथील अभ्यास केंद्र सभागृहात अत्यंत उत्साहात पार पडली. या वेळी सूर्यकांत पाटील अध्यक्षपदावरुन बोलत होते. संस्थेकडून समाज बांधवांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यांचा तो विश्वास सार्थ ठरविण्यासाठी युवकांनी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

समाजाच्या मूलभूत प्रश्नांना वाचा फोडून त्या समस्यांची सोडवणूक करणे, विखुरलेल्या स्वरुपातील आगरी समाजाची संघटित शक्ती उभी करणे, येणाऱ्या नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सज्ज होणे. ही संस्थेने उचललेली निर्णायक पावलं समाजाला चांगलीच भावली आहेत. समाजाविषयी आस्था, अस्मिता आणि अभिमान बाळगून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या युवा कार्यकर्त्यांची भक्कम फळी उभी करण्यावर संस्थेने भर दिला असल्याचे सांगून सूर्यकांत पाटील यांनी या वेळी मूलभूत प्रश्नांबरोबरच स्थानिक भूमिपुत्रांवर नोकरभरतीत होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्याचा इशारा दिला.

संस्थेने अनेक उपक्रमांचे संकल्प सोडले असून, त्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी जाणत्या, परिपक्व कार्यकर्त्यांची गरज आहे. याकरिता राजकीय बंधने तोडून समाजाच्या कामात समर्पित होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन संस्थेचे ट्रस्टी संजय ठाकूर यांनी केले. या वेळी एस. पी. पाटील, नलिनी पाटील, पी. वाय. पाटील यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिवंगत व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्यात आली.

# रोह्यातील अवैधधंदे बंद करण्याची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील अवैधधंदे बंद करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते निकेश पोकळे यांनी रोहा पोलिसांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

रोहा तालुक्यात मटका, जुगार, पत्रांचा क्लब, ऑनलाइन चक्री असे अवैधधंदे राजरोसपणे चालू आहेत. त्यामुळे लहान मुले, तरुणवर्ग बरबाद होत चालले आहेत. काही कुटूंबात भांडण–तंटे सुरू आहेत. रोहा तालुक्यात चालू असलेले अवैधधंदे त्वरीत बंद करावेत. अन्यथा उपोषण अथवा अन्य मार्ग पत्करावा लागेल, असे निकेश पोकळे यांनी रोहा पोलिसांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. पोकळे यांनी या निवेदनाच्या प्रती राज्याचे गृहमंत्री, कोकण विभाग पोलीस महासंचालक, जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही पाठविल्या आहेत.

# मुरूडमधील दत्तवाडी रस्त्यावर गतिरोधक बसवा; नागरिकांची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील परेश हॉटेल ते दत्तवाडी या मुख्य रस्त्यावर वारंवार अपघात होत आहेत. या रस्त्यावर सूचना फलक लावावेत व गतिरोधक उभारावेत, अशी मागणी दत्तवाडी परिसरातील नागरिकांनी मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मुरूड दत्तवाडी परिसरातील नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपअभियंता गोरे यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेऊन लेखी निवेदन दिले. या वेळी माजी सरपंच अजीत बाळकृष्ण कासार, प्रवीण भायदे, रुपेश रणदिवे, मंगेश मोहिते, उमेश भगत, सुनील देवगणे, विनोद भायदे व प्रणव दिवेकर व अन्य नागरिक उपस्थित होते.


(छाया : संजय करडे)

मुरूड शहरातील सार्वजनिक बांधकाम कार्यलयाजवळून जाणारा परेश हॉटेल ते दत्तवाडी हा रस्ता नवीन असल्याने त्यावरून दुचाकी वाहने वेगाने चालविली जातात. या रस्त्यावर झालेल्या अपघातात एका २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. या रस्त्यावर वारंवार अपघात होत असल्याने त्याठिकाणी सूचना फलक लावावेत व गतिरोधक उभारावेत, अशी मागणी सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपअभियंता गोरे यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

परेश हॉटेल ते दत्तवाडी या रस्त्यावर लवकरच सूचना फलक व गतिरोधक उभारण्यात येतील, असे उपअभियंता गोरे यांनी या वेळी सांगितले.

# राजर्षि शाहू महाराजांना पालीमध्ये अभिवादन

**पाली : प्रतिनिधी**

राजर्षि शाहू महाराज यांच्या १००व्या पुण्यतिथी निमित्त पालीमधील नागरिक, तहसीलदार व पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (दि. ६) शंभर सेकंद स्तब्ध उभे राहून शाहू महाराजांना अभिवादन केले. या वेळी शाहू महाराजांच्या विचारांचे आणि कार्याचे स्मरण करण्यात आले.


(छाया : धम्मशील सावंत)

सामाजिक समतेचे प्रणेते लोकराजे छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक समतेची बीजे रोवली असल्याचे यावेळी सांगण्यात आले. भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, हभप महेश पोंगडे महाराज, शेतकरी नेते शरद गोळे, बशीर परबलकर, सुभाष मोरे तहसीलदार दिलीप रायण्णावार यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# अलिबागमध्ये उद्या बिझनेस फोरम

## प्रदीप ताम्हाणे करणार व्यावसायिकांना मार्गदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

लायन्स क्लब अलिबागतर्फे रविवारी (दि. ८) सकाळी १० वाजता आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात बिझनेस फोरमचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विख्यात उद्योजक प्रदीप ताम्हाणे अलिबागमधील व्यावसायिकांना मार्गदर्शन करणार आहेत.

वाढत्या स्पर्धेच्या पार्श्वभुमीवर व्यवसाय टिकविणे आणि वृद्धिंगत करण्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी अलिबागमधील व्यावसायिक सक्षम व्हावेत, यादृष्टीने लायन्स क्लब अलिबाग तर्फे व्यावसायिकांना मार्गदर्शनपर बिझनेस फोरम सुरु करण्यात आला आहे. महिन्याच्या पहिल्या रविवारी यशस्वी उद्योजकांचे व्याख्यान आणि अनुभवकथन असे या फोरमचे स्वरुप आहे. या फोरमचे द्वितीय पुष्प गुंफताना विख्यात उद्योजक प्रदीप ताम्हाणे रविवारी सकाळी अलिबागमधील व्यावसायिकांसोबत संवाद साधणार आहेत.

प्रदीप ताम्हाणे एका कंपनीत संशोधन आणि विकास विभागात ‘कलर इनचार्ज’ म्हणून आणि त्यानंतर औषधी गोळ्यांवरील रंगीत आवरण तयार करणाऱ्या एका अमेरिकन कंपनीच्या लंडन शाखेत काही काळ नोकरी केली. मात्र औषधी गोळ्यांवरील रंगीत आवरण देण्याचे महागडे तंत्रज्ञान मातृभूमीला उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने त्यांनी स्वत:ची विनकोट्स कलर्स ॲण्ड कोटींग प्रायव्हेट लिमिटेड नावाची नवीन कंपनी उभारली. ताम्हाणे यांची कंपनी आज पावडर कोटींगमधील जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या कंपनी बनविली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने उद्योगश्री हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. रविवारी आयोजित करण्यात आलेल्या बिझनेस फोरममध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन लायन्स क्लब अलिबाग तर्फे करण्यात आले आहे. नाव नोंदणीसाठी भगवान मालपाणी ९८८१०५१०००, महेश चव्हण ८३९०९०९४६१, अभिजित पाटील ९३२५५२००५७, रोहन पाटील ९८२०३५०७२८ यांच्याशी संपर्क साधावा.

# शिक्षक सेवाज्येष्ठतेसाठी ३१ मेऐवजी ३० जून तारीख निश्चित

## ग्रामविकास विभागाने केले शिक्कामोर्तब ▌ शिक्षक परिषदेच्या लढ्याला यश

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षकांच्या बदलीसाठी ३१ मे ऐवजी ३० जून ही तारीख सेवाज्येष्ठतेसाठी ग्राह्य धरण्यात यावी, याबाबत शिक्षक परिषदेने सातत्याने निवेदने देऊन चर्चा घडवून तसेच न्यायालयात याचिका दाखल करून न्याय मागण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न केलेला होता. त्या अनुषंगाने ४ मे रोजी ग्रामविकास विभागाने याबाबत आदेश देत सन २०२२ मध्ये होणाऱ्या बदली प्रक्रियेत प्राथमिक शिक्षकांची सेवाज्येष्ठता ही ३१ मे ऐवजी ३० जून धरण्यासंदर्भात आदेश काढला आहे. राज्यभरातील शिक्षकांनी शिक्षक परिषदेवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. अन्यायग्रस्त शिक्षकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

याबाबत शिक्षक परिषदेचे संस्थापक आमदार संजय केळकर तसेच राज्य अध्यक्ष राजेश सुर्वे, शिक्षक नेते रावसाहेब रोहकले यांनी ग्रामविकास विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार यांची २० एप्रिल रोजी मंत्रालयात भेट घेऊन निवेदन सादर केले होते. हा विषय राज्यातील ३० ते ४० हजार शिक्षकांसाठी कसा अन्यायकारक आहे, ही बाब त्यावेळी निदर्शनास आणून दिली. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन राजेश कुमार यांनी दिले होते.

तत्पूर्वी शिक्षक परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष पुरुषोत्तम काळे, नाशिक विभागाचे विभागीय कार्यवाह रामकृष्ण बागल, महिला आघाडीच्या दीपमाला पाटील, सरिता काळे यांनी बदली अभ्यास गटाचे प्रमुख आयुष प्रसाद सिंग यांची १६ मार्च रोजी पुणे जिल्हा परिषद येथे भेट देऊन निवेदन सादर केले होते. बदली प्रक्रियेत २०१९ झाली बदली झालेल्या शिक्षकांवर होत असलेल्या अन्यायाबाबत भूमिका समजावून सांगताना यात प्रामुख्याने अतिदुर्गम भागात काम करत असलेल्या शिक्षकांवर कसा अन्याय होत आहे हे स्पष्टीकरण करून सांगितले होते.

शिक्षक परिषदेच्या वतीने वारंवार निवेदने देवूनही या कामात विलंब होत असल्याने नाशिक विभागीय कार्यवाह रामकृष्ण बागल यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात १६एप्रिल २०२२ रोजी ॲड. बालाजी शिंदे यांच्यातर्फे याचिका दाखल केली होती. यावरील सुनावणीच्या वेळी ॲड. शिंदे यांनी अभ्यासपूर्ण युक्तिवाद केला. यावर शासनाने दिलेल्या उत्तराच्या अधीन राहून उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २७ एप्रिल २०२२ रोजी याबाबत याचिककर्त्यांच्या बाजूने निकाल दिला. ३१ मे ऐवजी ३० जून तारीख धरण्यासंदर्भात ५ मे २०२२ च्या आत निर्णय घेण्याचे आदेश अप्पर मुख्य सचिव ग्रामविकास विभाग यांना दिले होते.

आयपीएलचा रनसंग्राम
आजचे सामने
■ पंजाब वि. राजस्थान (३.३० वा., मुंबई)
■ लखनऊ वि. कोलकाता (७.३० वा., पुणे)

# दिल्लीचा हैदराबादवर विजय

## वॉर्नर-पॉवेलची जोरदार फटकेबाजी

**मुंबई : प्रतिनिधी**

डेव्हिड वॉर्नर (५८ चेंडूंत नाबाद ९२ धावा) आणि रोव्हमन पॉवेल (३५ चेंडूंत ६७ धावा) यांच्या अर्धशतकांच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सने गुरुवारी सनरायजर्स हैदराबादवर २१ धावांनी मात केली. या विजयासह दिल्लीने (१० सामन्यांत १० गुण) हैदराबादला मागे टाकत आयपीएल गुणतालिकेत पाचवे स्थान मिळविले आहे.

मुंबईच्या ब्रेबॉर्न स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात दिल्लीने दिलेल्या २०८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना हैदराबादला २० षटकांत आठ बाद १८६ धावाच करता आल्या. आघाडीच्या फळीतील फलंदाज अपयशी ठरल्यानंतर निकोलस पूरन (३४ चेंडूंत ६२) आणि एडिन मार्करम (२५ चेंडूंत ४२) यांनी हैदराबादचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना इतरांची साथ न लाभल्याने हैदराबादला सलग तिसरा पराभव पत्करावा लागला.



तत्पूर्वी, दिल्लीने प्रथम फलंदाजी करताना तीन बाद २०७ अशी धावसंख्या उभारली. पृथ्वी शॉच्या अनुपस्थितीत सलामीला आलेल्या मनदीप सिंगला (०) पहिल्याच षटकात भुवनेश्वर कुमारने माघारी धाडले. मिचेल मार्शही (१०) लवकर बाद झाला. कर्णधार ऋषभ पंतने लेग-स्पिनर श्रेयस गोपाळच्या एकाच षटकात सलग तीन षटकार आणि एका चौकाराची आतषबाजी केली, पण याच षटकात तो २६ धावांवर (१६ चेंडू) बाद झाला. यानंतर मात्र वॉर्नर आणि पॉवेल यांनी चौथ्या गड्यासाठी अवघ्या ६६ चेंडूंत १२२ धावांची भागीदारी रचत दिल्लीला मोठी धावसंख्या उभारून दिली.

**संक्षिप्त धावफलक**

दिल्ली कॅपिटल्स : २० षटकांत ३ बाद २०७ (डेव्हिड वॉर्नर नाबाद ९२, रोव्हमन पॉवेल नाबाद ६७; भुवनेश्वर कुमार १/२५) विजयी वि. सनरायजर्स हैदराबाद : २० षटकांत ८ बाद १८६ (निकोलस पूरन ६२; खलील अहमद ३/३०).

# पनवेलच्या दुर्पता सौद, सिद्धेश पावशे यांनी बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक जिंकले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुणे येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये पनवेलची बॉक्सर दुर्पता सौद आणि सिद्धेश पावशे यांनी सुवर्णपदक जिंकले. या सब ज्युनियर मुले व मुलींच्या स्पर्धेत रायगडचे दोन सुवर्णपदके पटकावली.

पनवेलच्या दुर्पता सौद ऊर्फ छोटीने मुलींच्या ३८ किलो वजनी गटात सातारा, जळगाव येथील बॉक्सर्सचा पराभव केला आणि अंतिम फेरीत पुण्याच्या प्रतिस्पर्ध्याचा पराभव केला. तिला मोस्ट प्रॉमिसिंग बॉक्सर म्हणूनही गौरविण्यात आले. दुर्पता ही पनवेलमधील दगडी शाळेत इयत्ता सहावीमध्ये शिकते आणि प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांच्याकडे आणि माजी ऑलिम्पियन मनोज पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेते.





मुलांमध्ये सिद्धेश पावसे याने ६१ किलो वजनी गटात अंतिम फेरीत मुंबई, क्रीडापीठ अकोला आणि औरंगाबाद येथील बॉक्सर्सचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. आदई येथील रहिवासी सिद्धेश पावसे हा सिद्धार्थ वर्मा आणि अद्वैत शेंबवणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत.

या दोन्ही बॉक्सरची २० ते २५ मेदरम्यान कर्नाटकमधील बेल्लारी येथे होणाऱ्या आगामी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड करण्यात आली आहे.



(छाया : महादेव सरसंबे)

# दिशा क्रिकेट अकॅडमीतर्फे कोलाडमध्ये समर कॅम्प

**रोहे : प्रतिनिधी**

दिशा क्रिकेट अकॅडमीतर्फे कोलाड येथील एमडीएन फ्युचर स्कूल या ठिकाणी समर कॅम्प आयोजित करण्यात आला असून त्याचे उद्‍घाटन लता भतिकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी दिशा क्रिकेट अकॅडमीचे अध्यक्ष सुरेंद्र भातिकरे, प्रशिक्षक महेंद्र भातीकरे, आरपीएल व आरडीसीएचे सदस्य संदीप जोशी, दिशा क्रिकेट अकॅडमीचे सदस्य चंद्रशेखर सावंत, समर कॅम्पमध्ये सहभागी झालेले खेळाडू व त्याचे पालक् यांच्या उपस्थित होते. या कॅम्पचा जास्तीत जास्त खेळाडूंना फायदा होईल तसेच क्रिकेट प्रशिक्षण घेऊन त्यामध्ये करिअर करता येईल, असे अकॅडमीकडून सांगण्यात आले.

# चॅम्पियन्स लीग फुटबॉल : रेयालची अंतिम फेरीत धडक

**माद्रिद : वृत्तसंस्था**

रेयाल माद्रिद संघाने पिछाडीनंतरही दोन टप्प्यांतील लढतीअंती मँचेस्टर सिटीवर एकूण ६-५ अशा गोलफरकाने मात करीत तब्बल १७व्यांदा चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या अंतिम फेरीत धडक मारली.

सिटीच्या घरच्या मैदानावर झालेला उपांत्य फेरीचा पहिला टप्प्यातील सामना यजमानांनी ४-३ असा जिंकला होता तसेच माद्रिदच्या मैदानावर झालेल्या दुसऱ्या टप्प्यातील सामन्यातील जवळपास ८९ मिनिटे सिटीने वर्चस्व गाजवले. रियाद महारेझने (७३वे मिनिट) केलेल्या गोलमुळे सिटीला या सामन्यात १-० अशी, तर एकूण लढतीत ५-३ अशी आघाडी मिळाली.



सिटीचा संघ या स्पर्धेत आगेकूच करणार असे वाटत असतानाच ९०वे मिनिट आणि त्यानंतरच्या भरपाई वेळेत राखीव फळीतील रॉड्रिगोने गोल करीत रेयालला या सामन्यात २-१ अशी आघाडी मिळवून दिली तसेच एकूण लढतीत ५-५ अशी बरोबरी झाल्याने ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळ खेळविण्यात आला. यात सिटीचा बचावपटू रुबेन डियाजने तारांकित आघाडीपटू करीम बेन्झेमाला पेनल्टी भागामध्ये अयोग्यरीत्या पाडल्याने रेयालला पेनल्टी मिळाली. बेन्झेमाने (९५वे मिनिट) यावर स्वत:च गोल करीत रेयालला दुसऱ्या टप्प्यातील सामना ३-१ असा, तर एकूण लढत ६-५ अशी जिंकून दिली.

रेयालने यंदा उपउपांत्यपूर्व आणि उपांत्यपूर्व फेरीतही अनुक्रमे पॅरिस सेंट-जर्मेन आणि चेल्सी यांच्यावर पिछाडीवरून विजय प्राप्त केले होते. उपांत्य फेरीत सिटीविरुद्धही त्यांना मोक्याच्या क्षणी खेळ उंचावण्यात यश आले, मात्र सिटीचे पहिल्यांदा चॅम्पियन्स लीगचे जेतेपद पटकावण्याचे स्वप्न अधुरेच राहिले. गेल्या वर्षी अंतिम फेरीत त्यांना चेल्सीकडून पराभव पत्करावा लागला होता.

### *अंतिम फेरीत लिव्हरपूलचे आव्हान*

*चॅम्पियन्स लीगच्या अंतिम सामन्यात रेयाल माद्रिदपुढे लिव्हरपूलचे आव्हान असेल. हा सामना २८ मे रोजी पॅरिस येथे खेळवला जाणार आहे. २०१८च्या अंतिम सामन्यात हेच दोन संघ आमनेसामने आले होते आणि त्या वेळी रेयालने ३-१ अशी बाजी मारत विक्रमी १३व्यांदा या स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते. आता लिव्हरपूलला त्या पराभवाची परतफेड करण्याची संधी मिळणार आहे.*

# महिलांसाठी मोफत क्रिकेट प्रशिक्षण शिबिर


**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने रायगड क्रिकेट स्पोर्ट्स आणि वेल्फेअर असोसिएशन यांच्यातर्फे महिलांसाठी सात दिवसांचे मोफत क्रिकेट प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.



आदिती अभिराज दळवी यांच्या अध्यक्षतेखाली २० मेपासून पनवेल येथे सात दिवस हे शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिरात तज्ज्ञ मार्गदर्शक खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत. शिबिरात रायगड जिल्ह्यातील सर्व गटांमधील महिलांना प्रवेश दिला जाणार आहे. सहभागी होणाऱ्या खेळाडूंमधून महिलांचे विविध गटांचे संघ निवडण्यात येतील आणि त्यांचे सराव सामने खेळविण्यात येणार आहेत.

प्रशिक्षण शिबिर यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष आदिती दळवी, संदीप पाटील, विनय पाटील, सुहास हिरवे, सुमित झुंजारराव, प्रितम कय्या, महेश देशमुख परिश्रम घेत आहेत. अधिक माहितीसाठी संदीप पाटील (७२०८१८५६१३, ८३६९७८९३८५), प्रितम कय्या (९३२२२४३५३४) यांच्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## उमरानचा वेगवान मारा

**मुंबई :** हैदराबादच्या उमरान मलिकने यंदाच्या हंगामात आपल्या तेजतर्रार माऱ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. दिल्लीविरुद्धच्या सामन्यात त्याने चार षटकांत ५२ धावा दिल्या, मात्र या सामन्यातही त्याने सातत्याने ताशी १५० प्रति किमीच्या वेगाने गोलंदाजी केल्याचे पाहायला मिळाले.


उमराનने दिल्लीच्या डावातील अखेरच्या षटकातील चौथा चेंडू ताशी १५७ प्रति किमीच्या गतीने टाकला. हा आयपीएलच्या इतिहासातील दुसरा वेगवान चेंडू ठरला. सर्वांत जलद चेंडूचा विक्रम शॉन टेटच्या नावे असून त्याने २०११च्या हंगामात १५७.७१च्या गतीने चेंडू टाकला होता.

## सेहवाग म्हणतो, चेन्नईने जडेजाला कर्णधार करण्याचा निर्णय चुकीचा होता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा माजी सलामीवीर आणि धडाकेबाज फलंदाज वीरेंद्र सेहवागने सध्या सुरू असलेल्या आयपीएलमधील चेन्नई सुपर किंग्जच्या संदर्भात मोठे विधान केले आहे. यंदाच्या आयपीएलच्या सुरुवातीला रवींद्र जडेजाला कर्णधार म्हणून नियुक्त करण्याचा चेन्नईचा निर्णय चुकीचा होता, असे सेहवागने म्हटले आहे.

सेहवागने सांगितले की, हंगामाच्या सुरुवातीला चेन्नईने पहिली चूक केली, जेव्हा त्यांनी घोषणा केली की, धोनी कर्णधार होणार नाही आणि रवींद्र जडेजा कर्णधार असेल.



# कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद कबड्डी निवड चाचणी स्पर्धेला प्रारंभ

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे बालेवाडी येथील क्रीडांगणावर ४८व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत मुलांमध्ये अहमदनगर, मुंबई शहर, परभणी व रत्नागिरी, तर मुलींमध्ये यजमान पुणे व नाशिक संघांनी विजयी सलामी दिली.

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी मुलांच्या झालेल्या सामन्यात अहमदनगर संघाने यजमान पुणे संघावर ४३-३२ अशी मात करीत विजयी साकारला. मध्यांतराला अहमदनगर संघाकडे २१-१६ अशी आघाडी होती. अहमदनगरच्या शिवम पठारे, सौरभ जगताप, मोहसिन पठान यांनी चांगला खेळ केला. पुण्याच्या अनुराग कापसे व आदित्य शेळके यांनी चांगला प्रतिकार केला. मुंबई शहर संघाने नांदेड संघावर ३१-१६ अशी मात करीत पहिला विजय नोंदविला. मध्यंतराला मुंबईशहर संघाकडे १६- ७ अशी आघाडी होती. मुंबई शहर संघाच्या तुषार शिंदेने चांगला खेळ केला.



परभणी संघाने ठाणे संघावर २८-२३ अशी मात करीत विजय मिळविला. मध्यंतराला परभणी संघ ९-१६ असा पिछाडीवर होता. ही पिछाडी भरून काढत परभणीने विजय मिळविला. परभणीच्या आदेश पाईकराव व प्रसाद रुद्राक्ष यांनी मध्यंतरानंतर उत्कृष्ट चढाया करीत आपल्या संघाला विजयी करण्यात मोलाचा वाटा उचलला. त्यांना अरविंद राठोडव धनंजय माने यांची चांगली साथ मिळाली. ठाण्याच्या मंगेश सोनवणे व साईराज साळवी यांनी चांगला खेळ केला, तर आकाश पालकर व यश भोईर यांनी काही चांगल्या पकडी घेतल्या.

रत्नागिरी संघाने औरंगाबाद संघावर ३५-३० अशी मात करीत आपल्या गटात विजयी सलामी दिली. मध्यंतराला रत्नागिरी संघ १५-१७ असा पिछाडीवर होता. रत्नागिरीच्या श्रेयश शिंदे व वेद पाटील यांनी सुरेख खेळ केला. औरंगाबादच्या आदेश जाधव व सुनिल पांढरे यांनी चांगली लढत दिली.

मुलींच्या सामन्यात यजमान पुणे संघाने परभणी संघावर ४१-२७ असा दमदणीत विजय मिळवित विजयी सलामी दिली. मध्यंतराला पुणे संघाकडे २१-९ अशी आघाडी होती. पुण्याच्या समृद्धी कोळेकर हिने खोलवर चढाया केल्या. साक्षी गावडे व मनीषा राठोड यांनी पकडी घेत मैदान हलते ठेवत विजय मिळविला. परभणीच्या सोनाली पोळे व सुमन चव्हाण सुरेख खेळ केला.

नाशिकने बीड संघावर ५३-२२ विजय मिळवित विजय मिळविला. मध्यंतराला नाशिक संघाकडे ३१- १२ अशी भक्कम आघाडी होती. नाशिकच्या प्रणाली पाटील व गायत्री पठाडे यांनी उत्कृष्ट चढाया केल्या. संघमित्रा जाधव व ऐश्वर्या देवरे हिने चांगल्या पकडी घेतल्या. बीड संघाच्या कल्याणी फॅन्से हिने चांगल्या चढाया केल्या, तर श्रद्धा भस्मे व प्रतिभा फॅन्से यांची चांगल्या पकडी केल्या.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com